साप्ताहिक
# माणूस
चित्रवार्ता पुस्तक पुरवणीसह. सहा सप्टेंबर. एक रूपया.

हाही अनुभव जगण्यासारखा आहे.
दुःख सोसण्यातही मजा आहे.

## सत्तर दिवस




# सत्तर दिवस










१) नॅन्दोची बहीण सुसान पेरॅडो.

२) संघकप्तान मार्सेलो पेरेझ

३) आपल्या मुलांसह लिलियाना मिथॉल

सुटकेची स्वप्न पहात प्राण गमावणारे तीन दुर्दैवी जीव.

फेअरचाईल्डच्या आतील दृष्य :


हार्लेच्या गळ्याभोवती हात टाकलेला निकोलीश.




# सत्तर दिवस



(१)



(२)







(३)

(४)

१) पॅको डेल्गॅडो

२) कोच इन्शार्ते

३) पेद्रो अल्गोर्ता

४) जोव्हियर मिथॉल

शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या दुर्बल असलेली चौकडी




विमानाबाहेर आरामात पहुडलेली मुले.





(१) (२)

# सत्तर दिवस



(३)

विमानाचे शेपूट शोधून काढणारी पहिली विजयी तुकडी.

१) नॅंदो पेरॅडो

२) रॉबर्टो कॅनेसा

३) अन्टोनिओ व्हिजिंटिन



शेपटाचे आतील भागात
नॅन्दो पेरॅडो

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : पंधरावे – अंक चौदावा

६ सप्टेंबर १९७५

मूल्य : एक रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

छत्तीस रुपये

सहामाही वर्गणी

वीस रुपये

परदेशची वर्गणी

पंचावन्न रुपये

¤


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.


¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९

छायाचित्र मांडणी : सुनिल कुरणे


## □ मुक्तांगण '

मुले म्हणजे फुले. त्यांच्या संवेदना तंबोऱ्याच्या तारेसारख्या हलक्याशा स्पर्शानेही झंकारून उठतात. चाकोरीबाहेर जाण्याची त्यांची क्षमता. त्यांच्या भावनेला व बुद्धीला नवे नवे अंकूर फुटण्यासाठी मुक्तता हवी.

त्यातूनच पु. लं. च्या 'मुक्तांगण'चा जन्म.

एका लहानशा समारंभाने 'मुक्तांगण' योजनेचा शुभारंभ होतो. पुणे विद्यार्थी गृहाच्या सहकारनगरातील जागेतच ही योजना राबविण्यात येणार आहे. त्यासाठी पु. ल. देशपांडे यांनी एक लाखाची देणगी दिली आहे. मुक्तांगणातील खुल्या नाटयगृहाचं भूमीपूजन, वृक्षारोपण होतं. भाषणांची संख्या सोडल्यास लहान मुलांच्या चिवचिवाटात समारंभ रंगतो. त्यात एक धीट मुलगी माईकपुढे येऊन बोलायचा हट्ट धरते व आपला आनंद व्यक्त करून खऱ्या अर्थाने मुक्तांगणाचे उद्‌घाटन करते. पु. ल. आपल्या मिष्किल शैलीत मुक्तांगणाची कल्पना स्पष्ट करून सांगतात. नेहमीप्रमाणे हशा–टाळ्यांची दाद मिळते; पण लोक एकदा हासायला लागले की कोणत्याही वाक्यावर हसतात. त्यामुळे विषय किंचित बाजूला पडतो.

पोपटपंचीच्या धर्तीवर व माहितीचे ढिगारे डोक्यात जमविण्याच्या तत्त्वावर आधारलेली आजची शिक्षणपद्धत. त्या चाकोरीबाहेर मुलांना घेऊन जाणारे हे 'मुक्तांगण'. त्याबाबत पु. लं. च्या कल्पना तरी काय आहेत? त्यांना नेमकं काय अपेक्षित आहे? त्यात मुलांसाठी नेमकं काय करण्यात येणार आहे? असे अनेक प्रश्न.

मुक्तांगण हे एक क्रिएटिव्ह सेंटर व्हावं अशी कल्पना आहे. मुलांनी एकत्र जमावं. हवे ते रंग घ्यावेत. मनसोक्त चित्रं काढावीत, गाणी म्हणावीत, पुस्तकं वाचावीत, गोष्टी सांगाव्यात, गप्पा माराव्यात, आनंद मिळवावा.

: मग शाळेत आणि मुक्तांगणात काय फरक आहे?

शाळा म्हटली की शिकवणं आलं. दुर्दैवानं आज तरी चाकोरीबद्ध शिक्षणपद्धतीमुळे शिकण्यात मुलांना आनंद मिळत नाही.

मुक्तांगणात कोणीही शिकवणारं असणार

# मुक्काम पुणे


प्रकाश जोशी


नाही. मुलं येतील. एकत्र जमतील. ज्यांना ज्यात आवड असेल त्यात भाग घेतील. कुणाला चित्रं काढण्यात आनंद मिळतो तर एखाद्याला वाद्यं वाजवायला आवडतात.

रंग, वाद्य, नाटय अशी निरनिराळी माध्यमं आहेत. ती मुलांना एकदा इंट्रोड्यूस करून दिली की मग त्यांनी त्याचा मुक्तपणे वापर करावा.

आता रंगाचंच उदाहरण घेऊ. रंगसंगती किंवा रंग वापरावयाचा कसा हे मुलांना सांगितलं की त्याने कोणते चित्र काढावे किंवा कसे काढावे हे सांगण्यात येणार नाही. मुलाला असे पूर्ण स्वातंत्र्य दिले तरच तो सौंदर्याचा, आनंदाचा आस्वाद घेऊ शकेल.

मुख्य म्हणजे 'मुक्तांगण' हे खरोखरच मुक्त रहावे. त्यात कोठेही फॉर्म्यालिटी किंवा इन्स्टिटयूशनॅलिझम येऊ नये असे वाटते.

: पण हे केंद्र कायम स्वरूपात उभारायचे म्हणजे थोडीफार बंधनं घालावी लागतील ना?

परंतु त्याचा मूळ कल्पनेवर परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. म्हणजे असं की मुलं काही नासधूस तर करीत नाहीत ना? इतपतच लक्ष ठेवण्यात येईल.

मुलांची सौंदर्यदृष्टी व्यापक बनली, निर्मितीची प्रक्रिया त्यांच्या लक्षात आली की त्यांच्यातील डिस्ट्रक्टिव्ह टेंडन्सी नाहीशी होते.

वृक्षारोपणामागचा हेतू हाच आहे. झाड हे विकासाचं सुंदर प्रतीक आहे. मुलाने एक झाड लावले. त्याची निगा राखली की त्या झाडाशी त्याचे भावनिक नाते जुळते. आठवणी निगडित होतात. त्या झाडाची फुलं तो कधीच तोडणार नाही.

मुलं जमली. त्यांच्यासमोर सायकलचे पूर्ण भाग मोकळे करून ठेवले व त्यांना ती पुन्हा तयार करायला सांगितली किंवा बुकबाइंडिंग आहे. कापड फाडण्यापासून पूर्ण शिवून होईपर्यंत किती कष्ट पडतात हे मुलाला दाखविले की तो दुसऱ्याचा सदरा कधीही

---

**इस्लामिक संस्कृती परिचय लेखमालेतील रझिया वझिफदार यांचा 'इस्लामिक संस्कृती व तत्त्वज्ञान' हा दुसरा लेखांक पुढील अंकात प्रसिद्ध होईल.**

**–संपादक.**

फाडणार नाही. असे अनेक कल्पक कार्यक्रम हातीं घेता येतील.

: 'मुक्तांगण' ही कल्पना अतिशय व्यापक आहे. ती राबविण्यासाठी तशीच कल्पक, क्रिएटिव्ह मिडियाशी संबंधित असलेली माणसं हवीत.

अगदी बरोबर.

: तुम्ही कोणत्याही संस्थेला किंवा कार्याला देणगी देण्यापूर्वी सर्व बाजूंनी विचार करता. मुक्तांगणची सर्व जबाबदारी तुम्ही पुणे विद्यार्थी गृहावर सोपविली आहे; पण तुम्ही आताच 'मुक्तांगण'ची जी कल्पना सांगितलीत ती त्यांना पेलवेल का? त्या संस्थेच्या सिन्सिॲरिटीबाबत वाद नाही; पण कल्पकतेत कोठे तरी उणेपणा राहील असे वाटते.

'असंच मत काही जणांनी व्यक्त केलंय; पण त्यावर मी विचार केलाय. आणि दुसरं असं की सांस्कृतिक नेतृत्व' सांस्कृतिक हा शब्द मला नितकामा आवडत नाही. पण हे नेतृत्व शेवटी शाळांनी करावयाचे नाही तर कोणी करावयाचे हाही प्रश्न आहे. शेवटी शाळांनीसुद्धा आपली चाकोरी सोडून बाहेर पडलंच पाहिजे. मुक्तांगणासाठी जी कमीत कमी यंत्रणा हवी ती चांगल्या स्वरूपात पुणे विद्यार्थी गृहाकडे आहे. शिवाय पाचजणांची एक सल्लागारसमिती नेमण्याचा माझा विचार असून त्यावर क्रिएटिव्ह मिडियाशी संबधित जाणकार असतील.

: 'लहान मुलांसाठी कार्यक्रम करणाऱ्या 'बालबोध पीठ' यासारख्या काही संस्था आहेत. त्यांना 'मुक्तांगण'मध्ये सहभागी करता येणार नाही का?

'मुक्तांगण हे सर्वांसाठी खुले आहे. लहानांसाठी त्याचप्रमाणे मोठ्यांसाठी. ज्यांना त्यात आवड असेल, आत्मीयता असेल त्या सर्वांचे स्वागत; पण त्यांनी आपले कार्यक्रम, प्रोजेक्ट आम्हाला दाखवावेत व मगच काम करावे ही अपेक्षा. निव्वळ मनोरंजन हा 'मुक्तांगण'चा हेतू नाही. ◻

## ◻ पंचाऐंशी संपली

◻ उद्यानप्रसाद. रिक्षा थांबते. काठी टेकत म. म. द. वा. पोतदार उतरतात. काळी टोपी, कपाळावर आडवे गंध, निळसर बंद गळ्याचा लांब कोट, गळ्याभोवती शाल. त्यांना उतरवून घेण्यासाठी एकजण पुढे होतात. 'राहू द्या. मला आधार कशाला? तुम्ही पडाल. मीही पडीन. मी येतो सावकाश.'

शारदा ज्ञानपीठम्चे पंडित वसंतराव गाडगीळ यांची धावपळ. दादांचा ८६ वा वाढदिवस त्यांनी आयोजित केलेला. नऊ वाजले तरी दादांचा पत्ता नाही. फोन केल्यावर कळले ते लिहायला बसले आहेत; पण लेख संपवून ते निघतात. त्यामुळे गाडगिळांना हायसे वाटते.

'कोणता लेख लिहीत होतात?' जिना चढता चढता त्यांना कोणी तरी विचारतं. 'काय लिहिणार? लिहित होतो. मला चिडवायचा तुमचा विचार आहे का?' विचारणारा गांगरतो. 'मी लिहित नाही म्हणून आधीच बोंब. लिहिला 'चौदा विद्या आणि चौसष्ट कला.' लोकांना कळलं पाहिजे. विद्या कला......

वर चातुर्माससंस्कारवर्गाची मुलं तिष्ठत बसलेली असतात. 'वेळ झाला का?' ते विचारतात. 'काय करणार, वाटतं जाऊ नये कोठे; पण कोण ऐकतोय? मग वाट पहावी लागते. बघा लेको. मी तरी काय करणार? लोक जेवायला बोलावतात. आम्ही बारा वाजता उठून जातो दोन-तीनपर्यंत.'


संस्कारवर्गातील मुलांचे स्तोत्रपठण, महिलावर्गाचे पुरुषसूक्त, महिम्नस्तोत्र वगैरे म्हणून होतं. गाडगिळांचे संस्कृत भाषण. संस्कारवर्ग सर्वत्र सुरू करणार, वगैरे वगैरे. दादा उत्तरादाखल बोलतात. संस्कारवर्गाबद्दल संतोष व्यक्त करून इतिहासाकडे वळतात. मग फ्रेंच, डच, इंग्रज भारतात आले; पण कोठून आले? कोणीच विचारले नाही. मी फ्रान्समध्ये गेलो असताना एका महिलेने म्युझिम कसे दाखवले ते, रशियन व संस्कृत भाषेतील साम्य कसे आहे ते सांगतात.

'आता गादीविस्तारा आवरायचा आहे. तुम्ही शंभर वर्षे दिलीत. त्यातली ८५ संपली. उरली १५ तीसुद्धा फार थोड्यांना लाभतात. तोपर्यंत माझ्याने जे जमेल ते करणार.' अनेक संस्थांतर्फे श्रीफल व पुष्पहार अर्पण करून दादांना दीर्घायुष्य चिंतण्यात येते. समारंभ संपल्यावर काठी टेकत ते चालू लागतात. हालचालीत थोडा मंदपणा आलाय एवढेच. ◻

## ◻ इशारा

पुण्यात ज्या काही सुंदर संस्था आहेत त्यात एस्. एन्. डी. टी. कॉलेज एक. सुरेख हिरवळ, गर्द झाडी आणि सुरेख इमारती. 'होम सायन्स' कोर्ससाठी कॉलेज प्रसिद्ध आहे. म्हणजे ऑल राउंड गृहिणी तयार करण्याची शाळा. 'मिस होम सायन्स कॉंटेस्ट' पार पडली. फिल्म इन्स्टिट्यूटचे प्राध्यापक टी. सी. जॉन एक परीक्षक. ते म्हणाले, 'सहा वर्षांपूर्वी इन्स्टिट्यूचा विद्यार्थी होतो. त्या वेळी सुंदर पोरींचे कॉलेज म्हणून आम्ही एस्. एन्. डी. टी. कडे पहायचो. या वर्षी सुंदर पोरींचा आमच्या इन्स्टिट्यूटमध्ये तुटवडा पडलाय. आजची कॉन्टेस्ट पाहून फिल्म बनविण्यापूर्वी तुमच्याकडे यायला हरकत नाही असं वाटतंय.'

'आमच्या मुली तुम्ही नेल्यात तरी चालतील; पण त्यांनी इथला अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर.' मुख्याध्यापिका प्रत्येकाला सावधगिरीचा इशारा देतात. ◻



# सोलकढी

## □ साधेपणा ही नखऱ्याचीच तऱ्हा

'मी माणूस साधा आहे' आणि 'मी साधा माणूस आहे' या वरवर सारख्याच दिसणाऱ्या, दोन वाक्यांत खोलवर जो सूक्ष्म परंतु महत्त्वाचा फरक आहे तो 'सोलकढी'च्या तय्यार वाचकांना समजेल असे मी मानतो. त्यांच्यावर भिस्त ठेवूनच मी स्वतःबद्दल, 'मी माणूस साधा आहे' असे शपथपूर्वक सांगू इच्छितो. इतर जी माणसे माझ्यासारखी आहेत त्यांना मी बावळट म्हटतो. माझे बोलणे साधे आहे. माझे वागणे साधे आहे. माझे लिहिणे साधे आहे. माझे राहणे साधे आहे. साधेपणाला जर हातपायदाढी फुटली असती, त्याने सदराविजार चढवली असती, त्याला कांद्याची भजी परमप्रिय जाहली असती आणि त्याने 'सोलकढी'तून लाखो रसिकांना संतोषाचे साप्ताहिक वाढप केले असते तर त्याला 'अनंतराव' असेच नाव धारण करावे लागले असते, यात काय समजायचे ते समजा; पण काही मंडळी समजायचे ते समजत नाहीत. त्यांना माझा साधेपणा फसवा वाटतो. माझा साधेपणा हा नखरेलपणाच आहे, असे त्यांचे मत आहे. माझा निष्काळजीपणासुद्धा त्यांना नीटनेटकाच वाटत असणार.

मात्र एवढ्यावरून, महाराष्ट्राला साधेपणाचा-निष्काळजीपणाचा जसा भडक अभिमान आहे तसाच मलाही आहे असे कोणाला वाटले असेल तर ते बरोबर नाही. नखरा आणि नीटनेटकारा मला आवडतो; पण जमत नाही. त्यामुळे दाखविण्यापेक्षा झाकण्यातच माझे हिकमती हुन्नर खर्ची पडते. साहजिकच सजावटखुलावटीची नवनवनवी कुसरकारी करणाऱ्या दिव्यदृष्टीच्या कलावंताबद्दल मला नेहमी फार्फार आदर वाटत असतो.

म्हणूनच सॅनफ्रॅन्सिस्कोच्या एका मोटारमालकाला मी नुकताच सफशेल सलाम घातला. तब्बल पाच वर्षे खपून या हौशी गड्याने आपली गाडी मढवली—टेनिसच्या बुटांचे एकशेपन्नास तळ, चित्रविचित्र बटणे, आरसे, प्लॅस्टिकच्या बाहुल्या, खेळातल्या होड्या, नाणी, केस-विंचरक असल्या आगळ्या शोभक वस्तूंनी.

त्याच्या मोटारला पाहून अनेकांनी आपली नाके मुरडली. नाक मुरडणे ही गोष्ट सोपी नसते. सगळ्यांना आपले नाक नाही मुरडता येत. खरे म्हणजे फार थोडीच नाके मुरडायच्या लायकीची असतात. सखोल आणि व्यापक अभ्यास केल्यावर माझे तर असे मत बनले आहे की पुरुषांना मुळी नाक मुरडताच येत नाही. नाक मुरडताना त्यांचा सगळा चेहरा पण मुरडतो. ते बरोबर नाही. चेहरा असतो तसाच ठेवून नाक तेवढे चर्रर्र मुरडले गेले पाहिजे. ते बायकांना जमते. त्यात पुन्हा सुंदर बायकांना विशेषच चांगले जमते. नाक मुरडणारी सुंदर स्त्री अवतीभवती असेल तर आपल्या डोळ्यांना यथास्थित पीडा होणार हे बरे समजून असावे. असो. तिकडे अमेरिकेत म्हणे नाक मुरडायला शिकवण्याचे वर्ग असतात. वर्गात गर्दी असते. सहजी प्रवेश मिळत नाही. पुरुषांसाठी आणि बायकांसाठी वेगवेगळे तसेच एकत्रही वर्ग असतात. काही वर्गात नुसती व्याख्याने ऐकायची सोय असते. काही वर्गांत ही व्याख्याने सचित्र आणि सप्रयोग असतात. नाक मुरडायच्या क्षमतेचे संवर्धन करणाऱ्या गोळ्यांची तडाखेबंद विक्री तेथे होत असते. नाकात एक प्रकारचा लूप बसवूनसुद्धा हे क्षमतासंवर्धन साधले जाते. चमकी, नथ, बुलाख, मोरणी वगैरे अस्सल भारतीय नासिकालंकारांमुळे, मुरडल्या जाणाऱ्या नाकाला एक आगळी ऐट प्राप्त होते हे लक्षात आल्यामुळे त्यांना वाढती मागणी येऊ लागली आहे.

प्रशिक्षणाच्या या सोयीमुळे तर त्या सजवलेल्या मोटारीकडे पाहून अनेकजणांना नाके बरी मुरडता आली. मुळात त्याचेही कारण असे होते की मोटारसजावटीच्या ज्या रूढ नऊशेनव्व्याण्णव तऱ्हापद्धती होत्या त्यापेक्षा वेगळ्या म्हणजे हजाराव्या तऱ्हेपद्धतीने सॅनफ्रॅन्सिस्कोच्या त्या मोटारमालकाने आपली लाडली मोटार सजवली होती.

एकूण, नखऱ्याच्या तऱ्हा शंभर आणि वर.

(माझा) साधेपणा ही म्हणे त्यातलीच एक.

—अनंतराव



# अंगोला-टिमोर

## पोर्तुगीज वसाहतीतील संघर्ष

वा. दा. रानडे

पोर्तुगालने आपल्या वसाहतींना स्वातंत्र्य देण्याचे ठरविले. त्याप्रमाणे गिनी बिसाऊ आणि मोझांबिक स्वतंत्र झाले; पण अंगोला व टिमोरमध्ये मात्र यादवी-युद्ध सुरू झाले. अंगोलास येत्या नोव्हेंबरात स्वातंत्र्य देण्याचे पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी ठरविले आहे; पण कोणाच्या हाती सत्ता सोपवायची हा त्यांच्यापुढे प्रश्न आहे.

अंगोला व टिमोरमधील यादवी-युद्ध म्हणजे पोर्तुगालमध्ये चालू असलेल्या संघर्षाचेच पडसाद आहेत असे म्हणता येईल. अंगोलामधील दोन प्रतिस्पर्धी राजकीय संघटनात शस्त्रसंधीचा करार नुकताच झाला; पण तो कितपत टिकेल याची शंका आहे. कारण आतापर्यंत असे अनेक करार झाले व ते मोडले गेले. स्वातंत्र्यानंतर सबंध देशाची सत्ता आपल्या हाती आली पाहिजे, यासाठी तेथील राजकीय संघटनात चालू असलेल्या स्पर्धेतून सध्याचा संघर्ष निर्माण झाला. हा संघर्ष केवळ तेथील राजकीय संघटनांपुरताच मर्यादित नसून रशिया व चीन या कम्युनिस्ट राष्ट्रांनी त्यात बाजू घेतली आहे आणि आपल्याला अनुकूल राजवट तेथे आणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

अंगोलामध्ये एम्. बी. एल्. ए. ( पॉप्युलर मुव्हमेंट फॉर दि लिबरेशन ऑफ अंगोला ), एफ्. एन्. एल्. ए. ( नॅशनल फ्रंट फॉर दि लिबरेशन ऑफ अंगोला ) आणि यु. एन्. आय्. टी. ए. ( नॅशनल युनियन फॉर कंप्लीट इंडिपेन्डन्स ऑफ अंगोला ) या तीन गनिमी संघटना असून त्यांपैकी पहिल्या दोन अधिक प्रभावी आहेत. यापैकी एम्. पी. एल्. ए. ला रशियाचा पाठिंबा आहे. डॉ. ऑगस्टिनो नेटो हे या संघटनेचे अध्यक्ष आहेत. टांझानिया व झांबिया या आफ्रिकन राष्ट्रांशी त्यांचे मैत्रीचे संबंध आहेत. होल्ड व रॉबर्टो हे एफ्. एन्. एल्. ए. चे अध्यक्ष आहेत. त्यांच्या चळवळीस झायरेचे अध्यक्ष मोबुटू यांचा पाठिंबा आहे. झायरेमध्ये या गनिमी संघटनेची शिक्षण-केंद्रेही आहेत. मोबुटूंनी गेल्या वर्षी चीनला भेट दिली तेव्हापासून चीनने झायरेशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले आहेत. एवढेच नव्हे तर एफ्. एन्. एल्. ए. लाही मदत वाढविली आहे. या संघटनेच्या झायरेमधील केंद्रामध्ये चिनी तज्ज्ञ गनिमी लढयाचे शिक्षण देतात. अंगोला आपल्या प्रभावक्षेत्राखाली आणण्यासाठी याप्रमाणे रशिया व चीनची स्पर्धा चालू आहे.

टिमोरमधील संघर्षाचे स्वरूप निराळे आहे. टिमोरचे दोन भाग असून त्यांपैकी पश्चिम टिमोर इंडोनेशियाचाच घटक आहे. तर पूर्व टिमोरमध्ये पोर्तुगीजांची वसाहत आहे. सात लाख वस्तीच्या या छोटयाशा प्रदेशात टिमोर डेमोक्रॅटिक युनियन, रेव्होल्यूशनरी फ्रंट फॉर इंडिपेंडंट ईस्ट टिमोर ( एफ्. आर. ई. टी. आय्. एल्. के. आ. एन्. ) आणि पॉप्युलर डेमोक्रॅटिक असोसिएशन ऑफ टिमोर ( ए. पी. ओ. डी. ई. टी. आय. ) हे तीन प्रमुख पक्ष आहेत. त्यांपैकी टिमोर डेमोक्रॅटिक युनियन हा पक्ष उजव्या गटाचा आहे. गेल्या १० ऑगस्टला या पक्षाने उठाव करून टिमोरमधील महत्त्वाची सत्ताकेंद्रे आपल्या ताब्यात घेतली. विमानतळ, पोलिसांचे मुख्य ठाणे, रेडिओकेंद्र त्यांनी ताब्यात घेतले. या पक्षाजवळ पैसा चांगला आहे. मध्यमवर्गाचे लोक त्यास शस्त्रे पुरवितात. टिमोरमध्ये बारा हजार चिनी असून त्यांपैकी काही व्यापाऱ्यांचा या पक्षास पाठिंबा आहे. टिमोर पोर्तुगालचाच भाग रहावा अशी डेमोक्रॅटिक युनियनची प्रथम भूमिका होती. त्यानंतर टप्प्याटप्प्याने स्वातंत्र्य मिळावे या मागणीचा त्यांनी पुरस्कार केला; पण रेव्होल्यूशनरी फ्रंट फॉर दि इंडिपेंडन्स ऑफ ईस्ट टिमोर या डाव्यांच्या संघटनेचे हाती स्वातंत्र्यानंतर टिमोरची सत्ता जाण्याचा धोका दिसू लागला. तेव्हा ते टाळण्यासाठी स्वतःच उठाव करून टिमोरची सत्ता त्यांनी आपल्या हाती घेतली. टिमोरमध्ये चारशे पोर्तुगीज सैनिक आहेत; पण ते या संघर्षात तटस्थ राहिले. उठावाच्या दुसऱ्या दिवशी बंदराजवळच्या भागात विमानाने पोर्तुगीज छत्रीधारी सैनिक उतरविण्यात आले. त्यांनी तेथील परदेशी नागरिकांना व पोर्तुगीज सैनिकांच्या कुटुंबियांना डार्विन येथे हलविले. टिमोरची राजधानी डिलि येथील पोर्तुगीज सरकारही दुसरीकडे हलविण्यात आले.

टिमोर डेमोक्रॅटिक युनियनचा उठाव डाव्यांच्या संघटनेस काहीसा अनपेक्षित होता. महत्त्वाची केंद्रे डेमोक्रॅटिक युनियनने सध्या हाती घेतली असली तरी यादवी युद्धात त्यांचा निर्णायक विजय झाला असे म्हणता येणार नाही. कारण टिमोरमध्ये डाव्यांच्या संघटनेचाही बराच प्रभाव आहे. विशेषतः ग्रामीण भागात त्यांचे अधिक वजन आहे. टिमोरमधील ही डाव्यांची संघटना मोझांबिकमधील फ्रेलिमोच्या धर्तीवर उभारलेली असून फ्रेलिमोसारखेच तिचे धोरण आहे. डाव्यांच्या संघटनात रशियावादी आणि चीनवादी असे दोन तट अंगोलामध्ये जसे पडले तसे टिमोरमध्ये अजून पडलेले नाहीत; पण याचा अर्थ असे तट पुढे पडणार नाहीत असे नाही. कारण टिमोर आपल्या प्रभावक्षेत्राखाली आले तर चीनला ते पाहिजे आहे.

पॉप्युलर डेमोक्रॅटिक असोसिएशन ऑफ टिमोर ( ए. पी. ओ. डी. ई. टी. आय. ) हा तिसरा पक्ष टिमोरमध्ये असून त्याचा कल इंडोनेशियाकडे आहे. पोर्तुगीज टिमोर इंडोनेशियन टिमोरला जोडावा अशी या पक्षाची मागणी आहे. आपल्या शेजारच्या टिमोरमध्ये कम्युनिस्टांना अनुकूल सरकार अधिकारावर येणे—मग ते रशियावादी असो किंवा चीनवादी असो—इंडोनेशियाच्या हिताचे नाही. तेव्हा पोर्तुगीज टिमोर इंडोनेशिया टिमोरमध्ये सामील होणे इंडोनेशियास अधिक पसंत पडेल; पण त्यासाठी बळाचा वापर इंडोनेशियाचे नेते करू इच्छित नाहीत. या प्रश्नावर त्यांनी लोकशाहीवादी भूमिका घेतली आहे. पोर्तुगीज टिमोरचे भवितव्य तेथील लोकांनीच ठरवावयाचे आहे. त्यांना योग्य वाटेल तो निर्णय त्यांनी घ्यावा. इंडोनेशियन टिमोरमध्ये सामील होण्याचे त्यांनी ठरविले तर आम्ही त्यांचे स्वागत करू. असे आपले धोरण इंडोनेशियाच्या नेत्यांनी जाहीर केले आहे; पण सध्याच्या यादवी युद्धाच्या वातावरणात टिमोरच्या लोकांना खुल्या मतदानाने आपले भवितव्य ठरविण्याचा अधिकार मिळणार आहे का ? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. टिमोरमधील संघर्ष उजवे विरुद्ध डावे गट यांच्यात असून बळाच्या जोरावर त्याचा निर्णय दोन्ही बाजू लावून घेणार असे दिसत आहे. □

# बँक-राष्ट्रीयीकरणाचे अर्धे तप

प्रा. राम बिवलकर

१९ जुलै १९७५ रोजी या देशातील १४ बड्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्याला सहा वर्षे पुरी झाली. या अर्ध-तपाच्या काळात राष्ट्रीयीकृत बँकांनी केलेली प्रगती विचारात घेतली, तर बँक-राष्ट्रीयीकरणाची जी उद्दिष्टे जाहीर झाली होती ती साध्य करण्यात या बँका यशस्वी झाल्या असे म्हणता यायचे नाही. कारणे अनेक असतील; पण ते घडले नाही ही गोष्ट खरी.

राष्ट्रीयीकरणाच्या या सहा वर्षांचा आढावा घेताना प्रथम जमेची बाजू विचारात घेऊ. सहा वर्षांच्या काळात शाखावाढीच्या दृष्टीने बँकांनी बरीच मजल मारली आहे असे आकडे बोलतात. १९ जुलै १९६९ ते ३१ मे १९७५ या काळात बँकांच्या एकूण १०,३७५ नव्या शाखा देशभर उघडण्यात आल्या. त्यातील ५१५८ शाखा अदृष्ट बँकक्षेत्रात उघडल्या गेल्या. बँकांच्या गटाप्रमाणे शाखावाढ अशी :–

| | | |
|---|---|---|
| (१) चौदा राष्ट्रीयीकृत व्यापारी बँका | नव्या शाखा | ५६६७ |
| | त्यातील अदृष्ट बँकक्षेत्रात | २८७४ |
| (२) स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका | नव्या शाखा | २६८६ |
| | अदृष्ट बँकक्षेत्रात | १४३३ |
| (३) खाजगी बँका | नव्या शाखा | २०१२ |
| | अदृष्ट बँकक्षेत्रात | ८५१ |

१९६९ साली एकूण बँकांच्या देशभर पसरलेल्या एकूण ८२०५ शाखांपैकी ग्रामीण भागातील शाखा फक्त १८३२ (म्हणजे २२·४%) होत्या. १९७५ साली सर्व बँकांच्या एकूण १८५८० कार्यालयांपैकी ६७५४ शाखा (म्हणजे ३६·६%) ग्रामीण भागात वसल्या आहेत. या एकूण शाखांची वर्गवारी अशी :–

| | |
|---|---|
| शहरी विभागात | ३२३५ |
| अर्धशहरी विभागात | ५५३२ |
| मोठी शहरे व बंदरे या भागात | ३०५९ |
| ग्रामीण भागात | ६७५४ |
| एकूण | १८,५८० |

१९६९ साली ६५ हजार लोकसंख्येमागे १ बँकशाखा असे असलेले हे प्रमाण १९७५ साली २९ हजार जनसंख्येमागे एक बँककार्यालय एवढे वाढले आहे; पण तरीही या देशातील अनेक भागांना अजूनही बँक-दर्शन घडलेले नाही.

दुर्लक्षित क्षेत्रांना उपलब्ध होत नसलेला पतपुरवठा त्याला उपलब्ध करावा या दृष्टीने बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे पाऊल उचलले गेले होते. त्या दृष्टीने हे आकडे पाहा.

| | १९६९ | १९७५ |
|---|---|---|
| बँकांनी दिलेली एकूण कर्जे | ३५९९ को. रु. | ८९६३ को. रु. (यांत अन्नधान्यखरेदीसाठी ८०३ को. रु. दिले गेले. पूर्वी ही जबाबदारी केंद्र सरकारची होती. अर्थसंकल्पात त्यासाठी तरतूद असे.) |

शेती, छोटे उद्योग, निर्यात, जलवाहतूक व मोटारवाहतूक-चालक, किरकोळ व्यापारी, छोटे धंदेवाले, व्यावसायिक, स्वयंरोजगारवाले, शिक्षण या दुर्लक्षित क्षेत्रांना १९६९ साली एकूण कर्जापैकी ७६२ को. रु. म्हणजे २१·१% रक्कम आदा केली होती. आज या क्षेत्रांकडे बँकांच्या कर्जाचा ओघ वळला असून (इति रिझर्व्ह बँक) एकूण कर्जापैकी २८३६ को. रु. म्हणजे एकूण कर्जाच्या ३३% एवढी रक्कम या दुर्लक्षित क्षेत्रांना आदा केली आहे. (आकडे एप्रिल १९७५ चे) १९६९ साली शेतीकरता १८८ को. रु. आदा झाले. (५·२%) तर १९७५ एप्रिलअखेर ही रक्कम ७६७ को. रु. (८·९%) एवढी होती.

गेल्या सहा वर्षांत बँकांच्या ठेवीही मोठ्या प्रमाणात वाढल्या असे आकडेवारी दाखविते.

| बँक-गट | १९६९ (जून) | १९७५ (जून) |
|---|---|---|
| (१) स्टेट बँक व संलग्न बँका | १२३९ को. रु. | ३५४३ को. रु. |
| (२) राष्ट्रीयीकृत १४ बँका | २६३३ को. रु. | ६८३९ को. रु. |
| (३) खाजगी बँका | ७७४ को. रु. | १९८० को. रु. |

शेड्यूल्ड बँकांच्या दरडोई ठेवी १९६९ साली ८८ को. रु. एवढ्या होत्या त्या १९७५ साली २१० को. रु. एवढ्या झाल्या. ठेवींचे राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण पाहिले तर १९६९ साली ते १५·३% एवढे होते तर १९७५ साली ते २१% झाल्याचे ध्यानी येते. ही ठेवीतील वाढ राष्ट्रीयीकृत बँकांनी ठेवी वाढविण्यासाठी काही नवनवीन योजना राबविल्या किंवा जनसाधारणात बँकांचे विशेष आकर्षण निर्माण केले म्हणून घडली असे म्हणता येणार नाही. एक तर आपापल्या ठेवी वाढविण्यासाठी नवनवे उपक्रम काढण्याची जी चढाओढ राष्ट्रीयीकरणाच्या पहिल्या वर्षा-दोन वर्षांत दिसून आली ती चढाओढ आता थंडावलेली दिसते. म्हणजे ठेवी वाढल्या त्या देशांतील भरमसाठ चलनवाढीमुळे असेच गणित मांडायला हवे.

ठेवींचे राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले प्रमाण वाढले ही गोष्ट स्पृहणीय म्हटली तरी इतर प्रगत देशांशी तुलना करता ते अत्यल्पच आहे असे म्हणावे लागेल. उदाहरणार्थ कॅनडामध्ये ते ५५% आहे तर अमेरिकेत ते ६०% आहे. आपल्या आशियाई शेजाऱ्याचे,–जपानचे–हे प्रमाण तर ८५% एवढे आहे.

. राष्ट्रीयीकरणानंतरच्या सहा वर्षांत झालेली ही प्रगती खूपच वाटली तरी उद्दिष्टाच्या मानाने ही कमी तर आहेच; पण मंदगतीचीही आहे. त्याला कारणे अनेक आहेत. ग्रामीण भागात शाखावाढ करणे आणि दुर्लक्षित क्षेत्रांस पतपुरवठा करणे या धोरणातूनच अनेक समस्या उभ्या राहिल्या आणि बदलत्या काळाचे हे आव्हान स्वीकारण्यात बँकव्यावसायिकांना यावे तसे यश आले नाही. शाखावाढ करायची तर त्याकरता नवतंत्रशिक्षित. प्रशिक्षित नोकरवर्ग मोठ्या प्रमाणावर हवा होता. आजवरचे बँकर्स हस्तिदंती मनोऱ्यावर राहाणारे होते. त्यांना आता समाजाच्या दुर्लक्षित थराशी खांदाघासणी करायची होती. ही नवी सामाजिक दृष्टी बँककर्मचाऱ्यांनी आत्मसात करणे जरूर होते; पण ही पांढरी कॉलरवाली मंडळी हे समजून घेऊ शकली नाही असेच म्हणावे लागेल. ग्रामीण शाखांत काम करायला लागणे म्हणजे जणू अंदमानाची शिक्षा असे या कर्मचाऱ्यांना वाटते. त्यामुळे ग्रामीण परिस्थितीशी ही मंडळी अजूनही समरसली नाही. नव्या दृष्टीने भारली गेली नाहीत. अजुनी तारणापेक्षा उधारी-क्षमता व वैयक्तिक दानत लक्षात घेऊनच ग्रामीण भागात कर्जे द्यावी लागणार ही गोष्ट त्यांना उमजली नाही. ग्रामीण भागातील एजंट हा धोका पत्करायला तयार नाही. कदाचित् याबाबत कुठल्याच बँकेने अजूनही सुस्पष्ट धोरणे आणि पद्धती आखलेल्या नाहीत ही गोष्ट यामागे असेल.

इतरांपेक्षा किती तरी ज्यादा पगार-मान, भत्ते, सोयी, सवलती बँककर्मचाऱ्यांना मिळतात; पण असे असूनही, संघटनेच्या जोरावर संप, नियमावर हुकूमकाम असे अडेलतट्टूपणाचे धोरण बँककर्मचाऱ्यांनी अनेकदा अवलंबिले. याचा अर्थ काय घ्यायचा ? राष्ट्रीयीकरणानंतर बँकव्यवसायातही लाचलुचपत घुसली. कर्जात टक्केवारीची मागणी होऊ लागली. अफरातफरीच्या केसिस झाल्या. हा प्रकार बँकव्यावसायिकांना आपल्या नव्या राष्ट्रीय कार्याची जाणीव झाल्याचे दाखवीत नाही. शाखावाढ वेगाने झाल्यामुळे बँकेच्या मुख्य कार्यालयाचे शाखांवरील नियंत्रण ढिले झाल्यामुळे हे घडत असावे. त्याकरता दक्षतापथके नेमावी लागावी हे स्पृहणीय खचित नाही. आज बँकांच्या सेवेत दप्तरदिरंगाईसारखे दोष घुसले आहेत. ग्राहकांना तुसडी उत्तरे मिळू लागली आहेत. बँकसेवेत सुधारणा होण्याऐवजी अधोगती झालेली दिसते. एखादा धनादेश रिअलाइज व्हायला महिना महिना जातो. विम्याचे हप्ते वेळेवारी भरले जात नाहीत. गुंतवणुकीच्या दृष्टीने मार्गदर्शन मिळत नाही. बँकअधिकाऱ्यांचाही कर्मचाऱ्यांवर दबाव दिसत नाही. या सर्व गोष्टींत सुधारणा आवश्यक आहे.

राष्ट्रीयीकरणाला सहा वर्षे झाली तरी बँकक्षेत्राची पुनर्रचना अजूनही झालेली नाही. लीड बँकेसारख्या नवनव्या योजना जुन्याच चाकोरीतून राबविण्याने त्यांचे यश अजमावता कसे येईल ? अजूनही विविध बँकांच्या जाहिराती फडकतात. त्या माहिती देणाऱ्या नसून स्पर्धाळू असतात. राष्ट्रीयीकृत बँकांचे प्रतिवर्षी अडीच कोटी रुपये जाहिरातबाजीवर का खर्च व्हावेत ? तो खर्च न करता त्याचा फायदा ग्राहकांना देता येणार नाही का ? ग्रामीण भागातील तोट्यात चालणाऱ्या शाखा तोलण्याकरता त्याचा उपयोग होणार नाही का ? बँकांचे अनेकविध खर्च कमी करता येण्यासारखे आहेत.

ठेवींवरील व्याजाचे सर्वांचे दर सारखे; मग कर्जावरील व्याजाच्या दरात सुसूत्रता का नको ?-स्पर्धा सेवेची हवी. रिझर्व्ह बँकेने आणि केंद्रीय योजनामंडळाने याबाबतीत सुस्पष्ट धोरण आखून दिले पाहिजे. हवे तर त्याकरता एखादे मंडळ नेमा. सुसूत्रीकरण, नव्या योजना, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या एका बँकेतून दुसऱ्या बँकेत बदल्या करणे, प्रत्येक बँकेच्या आणि एकूण बँकक्षेत्राच्या कार्याचा आढावा घेणे, एकूण बँकक्षेत्राची त्वरित पुनर्रचना घडवून आणणे ही कामे त्या मंडळाला करता येतील.

पण या सर्व समस्या सोडविण्याचा आटोकाट यत्न न करता, व्यापारी व सहकारी बँका छोट्या शेतकऱ्यास कर्ज पुरविण्यास असमर्थ ठरल्या आहेत. शहरी दृष्टी असलेले व्यापारी, बँकांचे कर्मचारी ग्रामीण भागात पतपुरवठा करण्यास असमर्थ ठरले आहेत. त्यांना भलतेच वेतन द्यावे लागते. देशाच्या काही भागांना तर अजून बँकदर्शन नाही. म्हणून ५० नव्या विभागीय ग्रामीण बँका काढाव्यात अशा कल्पनेचा केंद्रीय अर्थमंत्री ना. सी. सुब्रह्मण्यम् पाठपुरावा करीत आहेत. विभागीय बँकांची कल्पना अगदी नवी आहे अशातला भाग नाही. १९४५ साली, सहकारी संस्था कमजोर असल्याने अॅग्रिकल्चरल क्रेडिट कॉर्पोरेशन स्थापन करण्याची कल्पना कै. डॉ. धनंजयराव गाडगिळांनी मांडली होतीच. ‘ग्रामीण पतपुरवठ्याचा पूर्ण भार सहकारी संस्थांवर टाकून व्यापारी बँकांनी त्यांना पूरक कार्य करावे’ अशी सूचना १९५० साली रूरल बँकिंग इन्क्वायरी कमिटीने केली होती. १९५४ साली ऑल इंडिया रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीने ‘हे काम व्यापारी बँकांच्याने निभणार नाही. त्या दृष्टीने सहकारी संस्थांना राष्ट्रीय पातळीवर पूरक ठरणारी एखादी सरकारी बँक हवी’ असे सुचविले होते व त्यातूनच १९५५ साली इम्पीरियल बँकेचे राष्ट्रीयीकरण करून स्टेट बँक अस्तित्वात आली. त्याच समितीने १९६९ साली आपल्या दुसऱ्या अहवालात ‘व्यापारी बँकांनी ग्रामीण क्षेत्रात सहकारी बँकांच्या बरोबरीने उतरावे’ असे सुचविले होते. त्यानुरोधाने १९६९ साली १४ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले व त्यांनी ग्रामीण भागात बरीच शाखावाढ केली; पण दोन्ही प्रकारच्या बँकांमध्ये कर्जदानाबाबत सुसूत्रता नसल्यामुळे दुहेरी पतपुरवठा होऊ लागला आणि सहकारी क्षेत्रवाले आपला धंदा बुडत असल्याची ओरड करू लागले ही गोष्ट सर्वश्रुतच आहे. म्हणजे व्यापारी बँका ग्रामीण क्षेत्रात सहकारी बँकांना पूरक न ठरता स्पर्धक ठरल्या !

१९७२ साली बँकिंग कमिशनने ग्रामीण बँका स्थापिण्याची शिफारस केली. चांगल्या चालणाऱ्या सहकारी संस्था हे काम करू शकतील. व्यापारी बँकांनी ग्रामीण गरजा लक्षात घेऊन विशेष प्रकारच्या ग्रामीण शाखा काढाव्यात अगर सहकारी पतसंस्था दत्तक घ्याव्यात असे सुचविले होते.

१९४५ ते १९७५ या तीस वर्षांच्या काळातील या विविध शिफारसी नवी संस्था स्थापित करण्याऐवजी असलेल्या संस्थांत सहकार जोपासावा, सुसूत्रीकरण करावे असेच सुचवितात.

अर्थात प्रयत्न करूनही ते साधले नाही. कधी पूर्वग्रह आड आले, कधी सुसूत्रीकरणाचे नियम व्यावहारिक अडचणीमुळे निरर्थक ठरले. सहकारी क्षेत्राला त्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील आपली ‘मिरासदारी’

पृष्ठ २७ वर

ह्यांच्या बदलीच्या निमित्ताने आम्ही या गावात रहायला येऊन फक्त चारसहाच दिवस झाले होते. मला तरी हे गाव फार आवडलं होतं ! गांव तसं छोटसं आणि टुमदार होतं. गावाबाहेर, लहान-मोठे बरेच उद्योगधंदे आणि उद्योगधंद्यांमुळे लोकांना रहाण्यासाठी अनेक नव्या वसाहती निर्माण झाल्या होत्या. तरीपण गावानं आपला टुमदारपणा, शानदारपणा जपून राखला होता. आम्ही गावाच्या दुसऱ्या टोकाला रहात होतो. इथे उद्योगधंदे नव्हते; मिलिटरी खात्याची दोन युनिटे, मिलिटरी हॉस्पिटल आणि याला लगतच आमची पाच-सहा बंगल्यांची छोटी कॉलनी होती. आमच्या कॉलनीसमोरच ' लिची बाग ' होती. या लिची बागेमुळेच या भागाला लिची बगान हे नाव पडलं असावं.

आमच्या घराच्या व्हरांड्यातून या लिची बागेचं भलंमोठं फाटक आणि आतली डौलदार लिचीची हिरवीगार झाडं सैनिकांप्रमाणे एका ओळीत असलेली दिसायची. बागेचा राखणदार बिहारी जातीचा इसम होता. बागेची राखण करायची म्हणजे बागेतल्या फाटकाजवळच्या एका झाडाखाली चादर पसरून त्यावर झोपा ताणायच्या हे त्याचं दिवसातलं काम. जवळपास शाळा नव्हत्या की गुरं राखणारी गुराख्यांची पोरंही वावरत नव्हती, त्यामुळे बागेत पोरं शिरून चोरी करण्याचा, नासधूस करण्याचा प्रश्नच येत नव्हता. शेजारच्या मिलिटरी युनिटमधला एखादा जवान वा ट्रकड्रायव्हर फावल्या वेळात लिची बागेत येऊन राखणदाराशी गप्पा छाटीत बसायचे. याशिवाय बागेत माणसांची वर्दळ नव्हती. त्यामुळंच बागेचा हा परिसर चित्राला शोभेल असा शांत आणि सुंदर होता. माझ्या विसाव्याच्या वेळीही मी लिचीच्या झाडांकडे पहात राही. हल्ली लिचीच्या झाडांवर मधूनच पिवळ्या पक्ष्यांची एक जोडी यायची. माझ्या शेजारणीनं सांगितलं, ' अग अग, ते बघ लव्हबर्डस ! काय सुंदर आहेत. '

संध्याकाळी हे ऑफिसातून घरी आल्यावर मी ह्यांना सांगितलं, ' अहो अहो, आपल्या समोरच्या बागेत लव्हबर्डस येतात ! मी आजच पाहिले. "

' असं, ! या नावाचे पक्षी असतात ? " ह्यांनी मलाच विचारलं !

' म्हणजे तुम्हाला असं वाटलं की काय की आपणच दोघं लव्हबर्डस आहोत ? ' मीच ह्यांना उलट प्रश्न केला.

माझ्या प्रश्नामुळे आम्ही हसलो. हे जरा वेळानं सांगू लागले, ' आज मी काही कामासाठी एरिया मेसमध्ये गेलो होतो. तिथं कळलं की एन. सी. सी. ऑफिसर कर्नल जॅपेथ चार महिन्यांनंतर बेंगलोरहून इथं परत आलाय. तो एरिया मेसमध्ये उतरला आहे, पण मला तो भेटला नाही. त्याचा कंपनीऑफिसर भेटला. तो सांगत होता की, कर्नल ' जॅपेथच्या ब्रेनचं ऑपरेशन झालंय आणि त्यातून बरा होऊन तो इथं पोस्टिंगवर आलाय. पूर्वी इतकी वर्ष तो मेसमध्ये रहात होता; पण आता त्याला डॉक्टरांनी सल्ला दिलाय की एखाद्या कुटुंबात रहा. एकटं राहू नकोस ! '

' मग त्याला कुटुंब नाही का भाऊबहीण नाहीत ? ' मला ह्यांच्या बोलण्याचा रोख लक्षात आला नव्हता, म्हणून मी विचारलं !

' अग, तो इतिहासच आहे. जॅपेथ जातीनं ज्यू आहे. त्याचे आईवडील लहानपणीच वारले. पब्लिक स्कूलमध्ये आणि नंतर मिलिटरी ॲकॅडमीत शिक्षण झालं. पुढं यानं लग्न केलं एका पंजाबी मुलीशी. ती खूप श्रीमंताची मुलगी, आपल्या लहरीप्रमाणे पैसे उडवायची. रेसेस, हॉटेल, क्लब यांचा तिला नाद. तिनं त्याच्याशी नऊदहा वर्ष कसा तरी संसार केला. मूलबाळ झालंच नाही. पुढं तिनं त्याला सोडचिठ्ठी दिली. ती मुंबईत आणि हा त्याच्या बदलीच्या गावी घर करून एकटा रहायचा. जॅपेथ आहे बुद्धिमान; पण विचित्र स्वभावाचा आहे म्हणतात. केवळ मदत करण्याच्या बुद्धीन.

# एझरा



● सौ. उज्ज्वला पिंपळखरे ●

द्यायची का त्याला आपल्या घरात जागा ? बघ, विचार करून सांग ! '

'आपल्या घरात रहायला तशी जागा भरपूर आहे. डाव्या बाजूचा व्हरांडा, त्याच्या लगतची खोली, बाथरूम आपण वापरतसुद्धा नाही. तेवढी जागा त्याला आपण देऊ शकू ! मग जेवणाची काय व्यवस्था?' मी विचारलं.

'आपल्या आउट हाउसमध्ये त्याचा ऑर्डली रहात जाईल. आपल्यापलीकडेच आर्टिलरीचं मेस आहे. तिथून तो जॅपेथचा चहा, नाश्ता, दोन्ही वेळचं जेवण आणत जाईल. ऑर्डली लंगरमध्ये जाईल जेवायला! कर्नल आपल्या जेवायच्या वेळी आपल्याच टेबलावर त्याचं जेवण घेत जाईल. बघ, काय करायचं ते ठरव. '

'एका बरोबरच्या ऑफिसरला त्याच्या अडचणीच्या वेळी मदत केल्यासारखं तर होईल ना?' मी म्हणाले आणि ह्यांचंही तसंच मत पडलं. दुसऱ्या दिवशी ह्यांनी कर्नल जॅपेथला भेटून 'आमच्या घरात जरूर रहायला या' असं सांगितलं. कर्नलला अर्थातच आनंद झाला.

चार दिवसांनी सकाळी दहाच्या सुमाराला हे कर्नलला घेऊन घरी आले. मी नुक्तीच देवाची पूजा आटपून घरातलं सामान जागेवर नीट लावून ठेवीत होते, खिडक्या पुशीत होते.

'मीट माय वाइफ' हे कर्नलला म्हणाले. दोघंही आत आले. कर्नलनी नमस्कारार्थ हात जुळवले. 'तुमचा बाबा कुठंय?' कर्नलनी आल्यावरोबर आमच्या संजयची चौकशी केली.

'कर्नलना मराठी छान येतं बरं का ?' हे मला म्हणाले. ह्यांनी पंख्याचं बटण सुरू केलं.

कर्नलचा ऑर्डली बाहेरच्या दारात उभा असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. कर्नलनी त्याला समोर बोलाविलं, 'देख नरसप्पा, तुम अपने एरिया मेसमें जाव ! थोडे टाइम के बाद मैं ऑफिस जाकर जीप तुम्हारे लिए मेसमें भेज देता हूँ । मेरा सब सामान उठाकर जीपसे यहाँ ले आव । बादमें यहाँके पीछे का मेसमें मेरा लंच इधर लाकर रख–'

'आज पहिलाच दिवस आहे, आज आपल्याकडेच लंच घ्यायला सांगा ना त्यांना.' मी ह्यांच्याकडे पहात सुचविलं.

'सर, आजचं लंच आमच्याच इथलं हं; वरणभात.' ह्यांनी त्यांना आग्रह केला.

'ओ. के.' ते हसत म्हणाले.

थोड्याच वेळात ते दोघं परत त्यांच्या ऑफिसात गेले आणि दीडच्या सुमाराला परत घरी आले. मी मनातून धाकधुकीत होते...बोलूनचालून हा कर्नल, शिवाय वेगवेगळ्या देशांत वावरलेला, हा जेवताना आमचा वरणभात पाहून नाकं मुरडीत तर जेवणार नाही ना ? पण तसं झालं नाही. कर्नल हात धुऊन आमच्या जेवणघरात आले. मी आपल्या पद्धतीप्रमाणं तिघांच्या पानांत पहिली वाढ करीत होते, ते पण वाढ करायला मला मदत करू लागले. मध्येच उठून त्यांनी चटकन फ्रिज उघडून पाण्याचा तांब्या काढला. 'संजय जेवायला येत नाही ?' असं विचारून चौकशी केली.

'त्याचं जेवण मी त्याच्या शाळेत पाठवते.' मी म्हणाले.

इतक्यात 'आई, आज सुट्टी. शंकर माझा टिफिन घेऊन आला; पण मी जेवलोच नाही. त्याच्याच सायकलवरून आलो.' संजय धावत आत शिरला आणि आम्ही बसलो होतो तिथं आला. 'ओ हो, आज वालाची उसळ आहे ना ? मी हात धुऊन आलो हं.' पण तेवढ्यात त्याचं लक्ष समोरच्या कर्नलकडे गेलं. 'नमस्ते अंकल.'

तो हात धुऊन लगेच आला. मी त्याचं ताट वाढून तयार ठेवलं होतं. खुर्चीवर बसल्यावर त्यानं हात जोडून 'वदनि कवळ घेता' असं मनाशी म्हटलं अन् मग जेवायला सुरुवात केली. कर्नल संजयकडे कौतुकानं पहात होते. आमचंही जेवण सुरू झालं आणि जेवणाबरोबर गप्पांनाही रंग चढला. कर्नल मोठ्या आनंदात मजा सांगत होते...जनरल प्यारेलाल जेवताना त्यांच्या कोणत्या खास जोक्स सांगतो येथपासून ते इफेल टॉवरवर असलेल्या बारमध्ये किती प्रकारच्या सुंदर सुंदर वाइन्स आहेत त्यांच्या नावांची एपासून झेड्पर्यंत कशी डिक्शनरी तिथं आहे, पठाणकोटहून जम्मू रस्त्यावर साधारणपणे दोन मैलांवर एका लहानशा सराईतला लचमन किती सुंदर तंदुरी चिकन बनवतो आणि गिन्हाइकाला प्रेमानं खिलवतो, तशी तंदुरी चिकन मुंबईच्या 'ताजमहाल'मध्येसुद्धा कोणाला बनविता येत नाही, अशा नानाविध माहितींचा खजिनाच कर्नलनी आमच्यासमोर मांडला...आमचं रोजचंच जेवण; पण त्या दिवशी कर्नलांच्या गप्पांमुळे विशेष चवदार वाटलं.

जेवणानंतर अखेरीला तिथेच 'मिसेस खरे, आजचं जेवण फारच छान झालं हं ! आज जेवलो इतका मी रोज कध्धी जेवत नाही. माझं रात्रीचं जेवण मेसमधून नरसप्पा आणील हं. नाही तर नरसप्पा मेसमधून जेवण आणायचा विसरत जाईल. अच्छा थँक्स.' असं म्हणून कर्नल आमच्या जेवणघरातून मधल्या दारानं त्यांच्या झोपायच्या खोलीत गेले. त्यांनी मधलं दार लावल्याचा आवाजही मी ऐकला.

मी आणि हे हात धुऊन आमच्या पुढच्या व्हरांड्यात आलो. 'एकंदरीत माणूस सज्जन वाटला. पहिलाच दिवस आहे.' मी ह्यांना हलक्या आवाजात म्हणाले.

'पहिला दिवस काय अन् शेवटचा दिवस काय दोन्ही सारखंच ! सज्जन माणूस सर्वकाळ सज्जनच असतो.' हे म्हणाले...दोन–चार मिनिटं स्तब्धतेत गेली. हे मला सांगू लागले, 'मघाशी इथं येण्यापूर्वी कर्नलनी मला सांगितलं की, 'खरे, एक विनंति ! माझ्याशी वाट्टेल त्या विषयावर बोल; पण माझी बायको–उमाबद्दल आणि पीटरबद्दल कध्धी काही विचारू नकोस !' ह्यांचा आवाज अगदी कोणाला ऐकू येणार नाही इतका अस्पष्ट होता.

मी विस्मयानं ऐकत होते.

हे पुढं सांगू लागले, 'मी म्हणालो, सर, अगदी खात्री बाळगा की आम्हाला पीटरचं नाव माहीत नाही आणि समजून घ्यायची उत्सुकता पण नाही. सांगायचं कारण की कर्नलला उमा आणि पीटरबद्दल चुकून काही विचारायचं नाही.'

थोड्या वेळानं कर्नल ऑफिसला जाण्यासाठी बाहेर आले. हे पण निघाले. संजय व मी पायरीवर उभे होतो. 'बाबा, टाटा !' संजय ह्यांना म्हणाला.

हे संजयकडे पाहून हात हलवीत जीपमध्ये बसले. कर्नलही बसले. गाडी सुरू झाली. मी आणि संजय घरात आलो.

दुपारचे साडेचार-पावणेपाच वाजले आणि दाराशी मोटारीचा आवाज ऐकून मी पलंगावरून उठले. उगीचच उठले आणि एकंदर

हालचालींचा कानोसा घेत बसले. पंधरा मिनिटांनी कर्नल परत बाहेर पडले. नरसप्पा आवारातच होता. 'कर्नलसाब गॉल्फ खेलने क्लब में चले गये.' त्यानं मला बातमी पुरवली.

रोजच्याप्रमाणे हे घरी आले आणि ह्यांच्याबरोबर कॅप्टन सुरीपण आला. दोघंही पुढच्या व्हरांड्यात बसले. मी चहा घेऊन तिथं आले–चहा गाळून दोघांचे कप त्यांच्यासमोर ठेवले.

'काय रे, तुझ्या घरात जॅपेथ रहायला येणार आहे म्हणून मी ऐकलं? खरं आहे ना?' कॅप्टन सुरींनी ह्यांना विचारलं.

'आजपासूनच रहायला आलाय् आमच्या घरात! पण तुला रे काय कर्नल जॅपेथविषयी माहीत?' ह्यांनी कॅप्टन सुरीलाच विचारलं.

'वा वा, मी आणि कर्नल जॅपेथ कोहिमात बरोबर होतो ना! कर्नल जॅपेथ स्वतः सर्जन आहे, A. M. C. कोअरचा आहे.'

'आँ? स्वतः सर्जन आहे?' मी आश्चर्यानं उद्गारले.

'हो हो! कोहिमात कर्नल एडि. एम. एम. होता. तिथल्या सर्व हॉस्पिटलांवरचा प्रमुख या नात्यानं त्यानं आपलं काम अगदी चोख ठेवलं होतं हं! आमच्या मेसपासून २ फर्लांगांवर मिलिटरी हॉस्पिटल होतं. या एम. एच. चा मेजर मल्होत्रा, मी, कर्नल जॅपेथ आमच्या मेसमध्ये पत्ते खेळत होतो.'

'हे कधीचं वर्ष?' मी विचारलं.

'ही घटना सत्तर सालची आहे. पत्ते खेळताना काही काम निघालं म्हणून मेजर मल्होत्रा जीप घेऊन कुठे तरी गेला. तो गेला आणि त्याचा फोन आला. एम. एच. मधून ड्यूटीऑफिसर आणि इथला रेंजर फोनवर होते. त्यांनी 'तातडीनं एम. एच. मध्ये या' असं मेजर मल्होत्राला सांगायला सांगितलं. कर्नल जॅपेथ फोनवर त्यांच्याशी बोलत होते.'

'कर्नलनं रेंजरकडून सर्व हकिकत ऐकली. या रेंजरला त्याच्या बायकोला इंफालला पोचवायची होती. तिथनं विमानानं तिला कलकत्त्याला जायचं होतं. रेंजरची जीप नादुरुस्त झाली होती म्हणून त्यानं कॅप्टन फगवाकडून चौकशी केली. एक मिलिटरी जीप कोहिमातून याच वेळेला इंफालला जात होती म्हणून रेंजर, त्याची बायको, दोन शिपाई असे सर्वजण मिलिटरी जीपमध्ये बसून एक-दीडच्या सुमाराला कोहिमातून इंफालकडे जायला निघाले.'

'कोहिमापासून सहासात मैलांवर ह्यांची जीप गेली आणि मिलिटरी जीप जात आहे असं पाहून नागा लोकांनी फायरिंग सुरू केलं. जीप एका आडोशाला उभी करून ड्रायव्हर, रेंजर वगैरे माणसं उतरून लपून बसण्याचा बेत करीत होती. तो सारी झटकन् जीपच्या आड दडली; पण रेंजरच्या बायकोला ते चटकन् जमेना. तिलाच स्प्लिन्टर लागला पोटाला आणि ती रक्ताच्या थारोळ्यात पडली. त्याबरोबर रेंजर, ड्रायव्हर वगैरे सर्वांनी तिला चटकन् जीपमध्ये घातलं आणि परत माघारी कोहिमातल्या एम. एच. (Military Hospital) मध्ये आणलं आणि तिथून रेंजर आणि ड्यूटीऑफिसरनं मेजर मल्होत्राला फोन केला.'

'कर्नल जॅपेथ मोठा सज्जन माणूस हं! प्रसंग ओळखून तो तश्शा सिव्हिल कपड्यात एम एच. मध्ये गेला. त्याला आलेलं पाहून सर्वांना हायसं वाटलं. रेंजरच्या बायकोची केस सीरियस होती. बारीक बारीक स्प्लिन्टरनी तिच्या आतड्यांना दुखापती झाल्या होत्या; पण जॅपेथनी ते बारके तुकडे कौशल्यानं काढून टाकले, आतड्याचा जवळजवळ एक फूट भाग कापून टाकला. ही शस्त्रक्रिया संपेपर्यंत अंधार पडला होता. आमच्या मेसमध्ये जॅपेथ रात्री परत आला तेव्हा इतका थकला होता की तो तसाच आडवा झाला होता.

'परत दुसऱ्या दिवशी सकाळी ड्यूटीवर जाण्यापूर्वी तो रेंजरच्या बायकोला पहायला गेला. तिला केवळ कर्नलमुळे पुनर्जन्म मिळाला, रेंजरनं तर कर्नलचे पाय धरले होते. त्याचे उपकार तितक्याच चांगल्या तऱ्हेनं फेडावे म्हणून रेंजरनं मनाशी बेत केला होता. त्याच्याजवळ एक चांगला घोडा होता. हा घोडा रेंजरनं कर्नलला भेट म्हणून द्यायचं ठरविलं. रेंजर त्या घोड्यावर बसून कर्नलला भेटायला आणि घोडा द्यायला म्हणून गेला. मी पण तिथंच होतो ना. घोडा पाहिला आणि कर्नल जॅपेथ असा संतापला, आम्हाला त्याला आवरताच येईना. तो सारखा रेंजरला गेट आऊट, गेट आऊट यहाँसे' असं ओरडत होता.'

'कमाल आहे माणसाची! घोडा पाहून इतका बिथरला? माणसाच्या स्वभावाला काही औषध आहे का?' मी म्हणाले.

'मग कळलं की जॅपेथची बायको रेसिस खूप खेळते ना म्हणून याला घोड्याचा तिटकारा आहे.' कॅप्टन सुरीनं त्याच्या (जॅपेथच्या) कृतीमागचा अर्थ उलगडून सांगितला...आम्ही जरा वेळ निःशब्द झालो.

'आता कर्नल असेल का खोलीत? मला त्यालाही भेटायची 'इच्छा आहे.' कॅप्टन सुरी इकडे तिकडे पहात म्हणाला.

'आत्ता थोड्या वेळापूर्वी कर्नलसाहेब आले पण लगेच गॉल्फ खेळायला परत गेले. आता ते साडेसातच्या सुमाराला परत येतील असं त्यांचा ऑर्डली सांगून गेला.' मी म्हणाले.

'बरं, मी त्यांची आठवण केली म्हणून सांगा हं! अच्छा नमस्ते!' असं म्हणून कॅप्टन सुरीनं आमचा निरोप घेतला.

थोड्या वेळानं मी आणि हे रोजच्या रस्त्यानं फिरायला बाहेर पडलो. तिचाकी फिरवीत संजय व्हरांड्यातच होता. आम्ही दोघंच फाटकाबाहेर पडलो आणि जवळच्या टेकडीवर चढून गेलो. तिथल्या एका वळणावरच्या झाडापर्यंत चालत गेलो. ते एक विशिष्ट झाड लाख काजव्यांनी उजळून निघायचं! ती लखलखीत शोभा पहाताना आज मला तरी कर्नल जॅपेथची उगीचच आठवण होत होती.

टेकडीवरून माघारी उतरताना, घरी येताना मी गप्प होते. आम्ही घरी येण्यापूर्वीच कर्नल जॅपेथ गॉल्फ खेळून परतले होते आणि संजयबरोबर आमच्या व्हरांड्यात बसलेले होते. संजय त्यांच्याशी बोलण्यात इतका रमून गेलेला होता की आम्ही घरी परतल्याचं त्याच्या लक्षातही आलं नव्हतं! हे कर्नलशी तिथेच बोलत बसले. मी सरळ आत गेले आणि रात्रीच्या जेवणाची तयारी करू लागले.

आठच्या सुमाराला मी संजयला हाक मारून म्हणाले, 'संजय, आज 'शुभं करोति' म्हणायचं विसरलास हं!'

'आई, आलो हं!' म्हणत तो आत आला पण लगेच 'आई, अंकलना आत्तापण जेवायला यायला सांग ना' असं माझ्या कानात हळूच म्हणाला.

'का रे, आज इतकी दोस्ती झाली त्यांच्याशी?' मी त्याला गंमतीनं म्हणाले.

'अंकल खूप गोष्टी सांगत होते मघाशी! मज्जा येते त्यांच्याशी बोलताना.' तो म्हणाला मला जरा नवल वाटलं.

मधूनमधुन हे दोनतीन दिवसांसाठी कधी 'युल' इथं तर कधी धरमशाला किंवा होशियारपूर इथं ऑफिसच्या कामानिमित्त जायचे. अशा संध्याकाळी मी आणि संजय आमच्या घराच्या पुढल्या व्हरांड्यात बसत असू! मी लोकरीचं विणकाम करीत असायची आणि संजय तिथं चित्र काढीत किंवा एखादं पुस्तक वाचीत असायचा. बाहेर अंधारून आलेलं असायचं! अंगणातल्या फुलांचा सुवास आणि रातकिडयांची किरकिर यामुळं संजय एखाद्या कोकराप्रमाणं माझ्या शेजारी येऊन बसायचा!

इतक्यात फाटक उघडल्याचा आवाज कानी यायचा.

कर्नल जॅपेथ गॉल्फ खेळून घरी परतलेले दिसले की संजय आनंदानं दोन पावलं पुढं जाऊन 'गुड इव्हिनिंग अंकल; अंकल, आय वॉन्ट अ न्यू स्टोरी' असं म्हणत उड्या मारीत त्यांच्या शेजारी बसायचा.

कर्नलनाही संजयचं आमंत्रण हवंच असायचं. समोरच्या खुर्चीत बसतबसत ते 'गुड इव्हिनिंग मिसेस खरे' मला म्हणायचे. संजयला मनातून दाटलेली अधीरता त्याच्या चेहऱ्यावर दिसायची...मग कर्नलही आपलं वय, सामाजिक प्रतिष्ठा सारं विसरून पस्तीस-चाळीस वर्षांपूर्वीच्या त्यांच्या शालेय आठवणी सांगायला लागायचे. त्यांचे हेड-मास्टर–मिस्टर चेटकडच्या गंमती, ड्रॉइंग मास्तर मि. ह्यूमची कडक शिस्त, स्वतःच्या खोडया हे सारं सुरेख सांगायचे.

'वरं का संजय, मी तुझ्याएवढा मुलगा होतो ना तेव्हा काडीसारखा बारीक होतो. आम्हा सर्व बोर्डरना रात्रीच्या जेवणानंतर दोन-दोन चमचे कॉडलिव्हर ऑइल प्यावंच लागायचं! मी माझा कप उचलायचा आणि कुंडीतल्या गुलाबात ओतून म्हणजे कपात थोडं पाणी घालून ते सर्व गुलाबात ओतून द्यायचा!

'माझा वर्गमित्र होमी भरुचा यानं एकदा गंमत केली. एका सकाळी आमचे हेडमास्तर राउंड घेत असताना होमी मुद्दाम या गुलाबाच्या कुंडीकडे वाकवाकून पाहत उभा राहिला. हेडमास्टरनी विचारलं, 'काय रे होमी, काय पाहतोस?'

'सर, या गुलाबाला कॉडलिव्हरचा खुराक आहे ना म्हणून त्याच्याकडे निरखून पाहतोय्.' होमींनी सांगितलं! 'अस्सं, कोण देतंय् कॉड लिव्हर गुलाबाला?' हेड मास्टरना आश्चर्य वाटलं! त्यांनी विचारलं आणि होमीचीच मान पकडून 'तू गुलाबाला कॉडलिव्हर ऑइल घालतोस का?' असं रागावून ते म्हणाले. होमीनं सांगितलं 'सर, मी नाही. हा विली जॅपेथ आहे ना तो त्याला दिलेलं कॉडलिव्हर ऑइल गुलाबाला घालतो.'...यावर संजय खदखदा हसला होता.

अशाच एका संध्याकाळी संजयनं त्यांच्याजवळ मागणी केली होती, 'अंकल, आज जनरल सूदचं शेवटचं भाषण परत एकदा बोलून दाखवा ना'...पण लगेच त्याला दुसऱ्या क्षणी दुसरीच आठवण झाली. 'अंकल, मला जपानी तऱ्हेचं कागदी जेटविमान करून द्या ना प्लीज.'

संजयनं घरातून वर्तमानपत्राचा कागद आणून कर्नलच्या हातात दिला. जॅपेथना जपानी कागदी-कला चांगली येत होती. वर्तमानपत्राच्या कागदाला सुरेख घड्या घालून, कोपऱ्यांना मुडपून त्यांनी सुरेख जेट-विमान संजयसमोर धरलं; पण समोरच्या घडीवर छापील मथळ्यातली जाड टाइपातली अक्षरं त्यांच्या नजरेत भरली...'अं! काय हे छापलंय्, पाहू बरं! पीटर जॅपेथला हॉकीच्या अंतिम सामन्यात शील्ड'...ते वाचताना थांबले.

संजयला तर कधी ते विमान हाती मिळेल याची घाई झाल्यामुळे त्यानं ते अधिऱ्या हातानं खेचलं आणि जॅपेथ ती बातमी वाचण्यात, अक्षरांवरून नजर टाकण्यात गुंतले होते. या ओढाताणीत ते वर्तमानपत्र फाटलं गेलं.

'संजय, अरे आजचं तर वर्तमानपत्र नाही ना घेतलंस? रात्री बाबा टूरवरून येतील तेव्हा त्यांना लागेल की आजचं वर्तमानपत्र!' मी म्हणाले; पण खरं म्हणजे संजयनं ते वर्तमानपत्र टरकविल्याची मला लाज वाटली. खरं म्हणजे संजयचा दोष नव्हता; तरी पण ते त्यालाच रागावतील असं मला वाटलं; पण झालं तिसरंच!

भावनांच्या आवेगानं कर्नलचा चेहरा इतका हेलावला की दोन्ही हातांनी त्यांनी आपला चेहरा झाकून घेतला आणि लगेच ते उठून आपल्या खोलीत गेले.

संजयला काहीच कळेना. मीही अवाक् होऊन पाहातच राहिले...थोडया वेळानं मी स्वयंपाकघरात आले आणि स्वयंपाकाला सुरुवात केली. माझा अर्धाअधिक स्वयंपाक होत आला, त्याच वेळेला संजयनं मला वर्दी दिली, 'आई, बाबा आले.' ह्यांची सूटकेस वगैरे सामान काढून घरात येईपर्यंत मी हात धुऊन पुढे झाले.

तेवढयात नरसप्पा आमच्या इथं येऊन सांगू लागला. जलदी चलिए साब, हमारे कर्नलसाबकी तब्येत खराब दिखती है! वे बिस्तरेपर लेटे हैं लेकिन देखिए तो–' एवढं बोलून तो थांबला; माझ्याकडे वळून म्हणाला, 'मेमसाब, जरा एक कप कॉफी बनाइए–'

नरसप्पाचं बोलणं ऐकल्याबरोबर हे सरळ कर्नलांच्या खोलीतच गेले. मीही कॉफीचा कप घेऊन ह्यांच्या मागोमाग गेले...कर्नल-साहेब त्यांच्या बिछान्यावर आडवे पडलेले होते. त्यांचा चेहरा अतिशय थकलेला दिसला. जवळच्या खुर्चीवर बसत हे त्यांना हलक्या आवाजात म्हणाले, 'गुड इव्हिनिंग सर, गरमगरम कॉफी घेणार का थोडी? मी पाजू का चमच्यानं?'

'कोण खरे का? हे बघ, एक काम कर, आपल्या डॉक्टर अगरवालला बोलावून घे आता!' त्यांचा आवाज खूप खोल वाटला मला! –' पण मुंबईत उमाला मुळीच कळवू नकोस! मला तिचं तोंड पहायचं नाही...' कर्नल अर्धवट गुंगीत असावे अशा तऱ्हेनं स्वतःशीच बोलत होते. 'मी मागे युद्धात कोरियामध्ये गोळ्यांच्या वर्षावात होतो... भोवताली प्रेतांचा खच पडत होता...पण उमाचं मला कधी बोटभर पत्र आलं नव्हतं! ही मुंबईत काय करीत होती तेव्हा? मजा, दुसरं काय? पीटरचा जन्म तेव्हाचा आहे. मी कोरियात असतानाचा...पीटर हा उमाचा मुलगा आहे, माझा नाही. तिचा, अबीदअल्लीचा! माझ्याखेरीज हे कोणाला माहीत नाही...पीटर जॅपेथ...आता वीस वर्षांचा असेल...वीस वर्ष मी हे सारं मनात ठेवलं...'

आम्ही हे सारं निःस्तब्ध होऊन ऐकत होतो. हे कर्नलांच्या खांद्यावरून हलकेच हात फिरवीत होते; नंतर तिथून उठून फोन करायला आमच्या हॉलमध्ये गेले.

माझ्या हातातला कॉफीचा कप तसाच होता. कर्नलांना बोलण्यामुळे अति थकवा आला होता. मला काय करावं हेच सुचेना. इतक्यात त्यांच्या घशात एकदम कसला तरी कण्हल्याचा विचित्र आणि अस्पष्ट आवाज आला.

बाहेर दाराशी मोटार आल्याचा आवाज आला. त्यातून डॉ. अगरवाल उतरले. ते आणि हे दोघंही खोलीत आले; पण त्यापूर्वीच कर्नल जॅपेथचे डोळे मिटले होते ते कायमचेच! ☐ ☐



हळदलेले हात
सळसळणारा पितांबर
श्रावणातलं ऊन
टपोरलेलं सूर्यफूल
फणारलेला नाग
द्वितीयेचा चंद्र
सौभाग्याचा संग
घमघमलेलं केतकी बन
अतृप्त
स्पष्ट
पवित्र




पिवळ्या रंगाच्या अनेक छटा

नेरोलॅक

U-GNM-186

**मूळ लेखक : पियर्स पॉल रीड**
**अनुवाद : रवींद्र गुर्जर**
**लेखांक : सहा**


: १ :

एक नवीन पद्धत लवकरच उदयास आली. अमेरिकेच्या घटनेप्रमाणे त्यातही नियंत्रण आणि समतोल राखला जाऊ लागला. मोहिमेत भाग घेणाऱ्या लोकांची ' सत्ता ' स्ट्राऊचबंधू आणि डॅनियलनं कमी केली आणि त्या तिघांवर मोहिमेतल्या मुलांनी मर्यादा घातल्या. दोन्ही गट एकमेकांविषयी आदर बाळगून होते. एकोणीस जणांच्या अलिखित मान्यतेनुसार त्यांचा कार्यक्रम चालू होता.

रॅफेल अन् नोगायरा जखमी असल्यामुळे त्यांना कशातच भाग घेता येत नसे. कॅनेसानं टांगलेल्या बिछान्यावर ते सदैव पडून असत; क्वचितच विमानाबाहेर जात. बर्फावरून चालताना त्यांना खूप कष्ट होत. उरलीसुरली शक्तीही त्यात नष्ट होईल अशी भीती त्यांना वाटायची. दोघांच्याही जखमा होत्याच तशा गंभीर. त्यातून सेप्टिक झालेलं. रात्री एकानं किंचितशी हालचाल केली तर दुसऱ्याला असह्य वेदना होत. दिवसा, त्यांच्या पायांतील रक्तप्रवाह चालू राहण्यासाठी डॅनियल मसाज करी.

रॅफेल सुटकेविषयी पूर्ण आशावादी होता. रोज सकाळी तो स्वत:शी म्हणे, ' मी रॅफेल इचॅव्हरन, अशी प्रतिज्ञा करतो की वाट्टेल त्या परिस्थितीत घरी परतणारच. ' त्याला कोणी तरी सुचवलं की ' घरच्यांना एखादं पत्र लिही. ' तेव्हा तो म्हणाला, ' बिलकूल नाही. मी परत गेलो की समक्ष सगळी हकिगत सांगणार. ' तो मोकळ्या मनाचा होता. शिवाय त्याच्या या श्रद्धेमुळे इतर मुलांना तो खूप आवडे. पायाला धक्का लागला तर तो आधी खूप शिव्या देई; पण लगेच क्षमा मागे. तो वातावरण प्रसन्न ठेवी.

पण हळूहळू त्याची स्थिती ढासळली. पायाची सूज वाढून त्यात पू झाला. तो काळानिळा पडला. एका सकाळी मुलांचं लक्ष आपल्याकडे वेधून तो म्हणाला–अगदी नेहमीच्या खंबीर स्वरात म्हणाला, ' आता मरणार आहे. ' इतरांनी त्याला गप्प करायचा प्रयत्न केला; पण तो आपलं म्हणणं सोडीना. आपली मोटारसायकल घरच्या मुख्य नोकराला आणि जीप भावी पत्नीला द्यायला त्यानं सांगितलं. त्याची खचलेली मन:स्थिती दुसऱ्या दिवशीपर्यंत टिकली आणि पुन्हा तो ताळ्यावर आला; पूर्वी इतकाच आशावादी बनला.



आठ जणांच्या मृत्यूनंतर राहिलेली मुलं अनिश्चित भवितव्याकडे डोळे लावून बसली. पुढचे दोनतीन दिवस बाहेर जाता आलंच नाही. पोटात अन्नाचा घासही घालता आला नाही. पंधरा नोव्हेंबरनंतर उन्हाळा सुरू होईल हीच एकमेव आशा होती. वाट बघण्याखेरीज ती मुलं काहीच करू शकत नव्हती. चिलीच्या दिशेनं पश्चिमेकडे जाण्यासाठी पहिल्या तुकडीची निवड झाली. त्यांना खास सवलती देण्यात आल्या. अन्नाचा वाटाही अधिक. बाकीच्या मुलांपैकी जे अशक्तपणामुळे किंवा जखमांमुळे काम करू शकत नव्हते, त्यांच्यावर मात्र अन्याय होऊ लागला. त्यातूनच भांडणं, मनस्ताप, निराशा आणि गैरसमज निर्माण झाले. पण पुढे ती परिस्थिती सुधारली..........

त्या मानानं नोगायराची शारीरिक स्थिती बऱ्यापैकी होती; पण मानसिक अवस्था सर्वांत दयनीय बनली होती. आधीच तो एकलकोंडा आणि भिडस्त होता. घरातही तो गप्प राही. त्याची प्रेयसीच फक्त त्याला बोलकं करी. तिनंही आयुष्यात खूप दुःख भोगलं होतं. दोघांची मैत्री अतूट होती.

त्याखेरीज त्याला राजकारणात रस होता. सुधारणांसाठी दंडुकेशाहीचा वापर करावा असं त्याचं मत होतं. झेर्बिनोप्रमाणे पूर्वी तो झोपडपट्ट्यांमधे काम करी. पण अलीकडे, मुळात दारिद्र्यावरच घाव घातला पाहिजे असं त्याचं मत बनलं होतं. वरवरच्या मलमपट्टीचा काहीएक उपयोग नसतो. सध्या तो आपले हिरवे डोळे छताकडे लावून शांतपणे पडून राही. आपण एकविसाव्या वर्षी मरणार आहोत, ही गोष्ट लहानपणापासून त्यानं डोक्यात घेतली होती. त्यानं पेरॅडोला सांगितलं की 'मी काही यातून वाचत नाही, मला पक्कं ठाऊक आहे.'

सगळ्या मुलांपासून तो एकटाच वेगळा पडला. ही वाईट बाब होती. तशा स्थितीत कोणीही त्याचं मन रिझवायच्या फंदात पडत नसे. पेद्रो आल्गोर्ता हा एकमेव त्याचा मित्र. त्याच्या तुटकपणामुळे सर्वांना फार राग येई. एकदा पेझ आपल्या वडलांच्या आफ्रिकादौऱ्याविषयी गोष्ट सांगत होता. ते ब्रिजिटी बार्दोटला कसे भेटले, एकूण सफर किती छान झाली वगैरे.

'काय, नोगायरा, तुला हे ऐकून कसं काय वाटलं ?' कॅनेसानं विचारलं.

'छे, मला त्यात मुळीच इंटरेस्ट नाही. मी समाजवादी आहे.' तो म्हणाला.

'समाजवादी वगैरे काही नाही, तू मूर्ख आहेस,' कॅनेसा त्याला म्हणाला. 'इतके नखरे करायला नकोत.'

'तुम्ही सगळे सत्ताप्रिय आणि प्रतिगामी आहात.' नोगायरा कडवटपणे म्हणाला. 'तुम्ही कौतुकानं सांगता तसल्या ऐहिक आणि व्यक्तिगत सुखामधे लोळायची माझी इच्छा नाही...विशेषतः तुझ्या म्हणण्याप्रमाणे, पेझ.'

'मी यापुढे त्याच्याकडे लक्ष देणार नाही,' कार्लिटस पेझ म्हणाला.

'तू कोणीही असलास तरी पहिल्या प्रथम एक माणूस आहेस, हे विसरू नकोस. सध्या इथे त्यालाच जास्त महत्त्व आहे.' इन्सार्ते ग्रामिकपणे नोगायराला म्हणाला.

'जाऊ दे,' अल्गोर्ता म्हणाला, 'या सगळ्या अगदीच मामुली गोष्टी आहेत.'

नोगायरा गप्प झाला. मागून त्यानं पेझची क्षमा मागितली.

दिवसा चांगलं ऊन पडलं तरी तो विमानातच पडून राही. डोक्यावरच्या भोकातून पडणारं थेंबथेंब पाणी साठवून त्याचा पिण्यासाठी वापर करी. मग अल्गोर्ता, कॅनेसा किंवा झेर्बिनो त्याला बाहेरून पाणी आणून देत. बाहेर पडण्याविषयी खूप आग्रह केला तरी त्यानं आपली जागा कधीच सोडली नाही. त्याचा उत्साह टिकून राहावा म्हणून मग मुलं त्याच्या घरादाराविषयी बोलत बसत. पायाच्या जखमांविषयी तो अतिशयोक्ति करतो अशी कित्येकांची समजूत होती.

फेअरचाइल्डमध्ये फारच थंड हवा असे. त्यातून ओलसरपणा आणि अंधार. तशा दमट हवेत जखमी मंडळींना वेळ काढावा लागे. नोगायरा अधिकाधिक अशक्त होऊ लागला. मुलांच्या लक्षात आलं की, त्याच्या वाटचाचं अन्न तो खाऊ शकत नाही. मग अल्गोर्ता छोटे छोटे मांसाचे तुकडे त्याच्या तोंडात ओले करून घाली.

पेरॅडो आणि फिटोच्या शेवटी ध्यानात आलं की एकाकीपणा त्याला मृत्युपंथाकडे नेत होता. त्याच्याजवळ जाऊन पेरॅडो म्हणाला, 'तुला मरायची हौस आलीय् का ?'

'माझे दिवस भरलेतच मुळी,' नोगायरानं उत्तर दिलं.


'मुळीच नाही,' पेरॅडो म्हणाला, 'तुझ्या मैत्रिणीच्या वाढदिवसाला मी तुला घेऊन जाणारच. तू बघच आता.'

रात्री झोपायच्या तयारीपूर्वी नोगायरानं विचारलं, 'आज मी प्रार्थना सांगू का ?' पेझनं आनंदानं पुस्तक त्याच्या ताब्यात दिलं. त्यानं इतक्या ओथंबलेल्या आवाजात सर्वांना सुयश आणि स्वास्थ्य चिंतलं की राहिलेल्या एकजात अठरा जणांना त्याच्याविषयी आदर आणि अपार प्रेम वाटू लागलं. प्रार्थना संपल्यावर पाच मिनिटं संपूर्ण शांतता पसरली. बिछान्यावरून फक्त नोगायराच्या रडण्याचा आवाज तेवढा येत होता. पेद्रो त्याच्याजवळ गेला आणि त्यानं काही त्रास होतोय का ते विचारलं. आर्चरो नोगायरा म्हणाला, 'छे, छे; उलट मी ईश्वराच्या अगदी निकट पोचलो आहे.'

प्रवासाला निघण्यापूर्वी एका कागदावर त्यानं सामानाची यादी केली होती. त्याच्या मागच्या कोऱ्या बाजूला थरथरत्या अशक्त हातानं तो प्रेयसीला आणि आईवडलांना पत्र लिहू लागला.

सध्याच्या परिस्थितीत आमची तर्कबुद्धी अपुरी पडत आहे. ईश्वराच्या असीम आणि अनन्य शक्तीची जाणीव होऊ लागली आहे. त्याच्यापुढे मनुष्य अत्यंत क्षुद्र आहे. या वेळी मी ज्या असह्य वेदना सोसत आहे–शारीरिक आणि मानसिक–त्यामुळेच

पृष्ठ २० वर



# पॅपिलॉन पुस्तक योजना

पॅपिलॉन पुस्तक योजना

## योजनेचे स्वरूप

**या योजनेत दरमहा एक पुस्तक याप्रमाणे एकूण पाच पुस्तके प्रकाशित होतील.**

**योजनेतील प्रत्येक पुस्तकाची दर्शनी किंमत सुमारे १५ ते २० रुपये राहील.**

**आज नोंदणीशुल्क दहा रुपये भरून पॅपिलॉन पुस्तकयोजनेत सहभागी होणाऱ्या व्यक्तीस मात्र यातील प्रत्येक पुस्तक दरमहा फक्त पाच रुपयात मिळू शकेल. पाठवणी, टपाल इ. खर्च मात्र ग्राहकाकडे राहील.**

## योजनेसंबंधी आणखी थोडे

योजनेतील पहिले पुस्तक पॅपिलॉन हे ५ ऑक्टोबर ७५ ला प्रकाशित होईल.

पूर्वसूचना मिळाल्यावर ग्राहकाने विशिष्ट मुदतीत पाच रुपये भरून आपले पुस्तक कार्यालयातून घेऊन जावे किंवा ५ रुपये + टपाल–पाठवणीखर्च इतक्या रकमेची त्याला व्ही. पी. केली जाईल. ती त्याने सोडवून घ्यावी.

व्यक्तिगत ग्रंथसंग्रह हा योजनेचा मूळ हेतु असल्याने ग्रंथ–विक्रेत्यांना या योजनेत सहभागी होता येणार नाही.

ज्या ग्राहकास दरमहा पाच रुपये भरणे गैरसोयीचे वा त्रासाचे असेल अशांनी एकरकमी ३५ रुपये पाठवल्यास त्यांना ही पाचही पुस्तके वरीलप्रमाणे मिळू शकतील.

पैसे शक्यतो मनिऑर्डरने पाठवावेत. चेक असल्यास वटणावळ २ रुपये अधिक पाठवावी.

चेक, ड्राफ्ट, म. ऑ. राजहंस प्रकाशन या नावे पाठवावी. सोबत नाव, पत्ता संपूर्ण असावा.

योजनेची मुदत ३० सप्टेंबर १९७५ पर्यंत आहे.

## पॅपिलॉन योजनेत प्रकाशित होणारी पाच दर्जेदार पुस्तके

अंदाजे मूल्य

### पॅपिलॉन

मूळ लेखक : हेन्री शॅरियर
अनुवाद : रवींद्र गुर्जर
रुपये वीस.

### हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा

अशोक परळीकर
रुपय पंधरा.

### संचित

पाश्चिमात्य लेखकांचा वेधक परिचय
शिवाय ' मी गॉर्की बोलतोय '
सुमती देवस्थळे
रुपये वीस.

### देवाघरचा पाऊस

रवींद्र पिंगे
रुपये पंधरा.

### सिनेकलावंतांची व्यक्तिचित्रे

?

---

**सुमारे ७५ ते १०० रुपये किंमतीची एकूण ५ पुस्तके फक्त ३५ रुपयात.**

# पॅपिलॉन पुस्तक योजना

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९

# सत्तर · दिवस

पृष्ठ १७ वरून

मी त्याच्याजवळ पोचू शकलो. मोडलेला पाय आणि सुजलेले गुडघे याच्यामुळे शारीरिकदृष्टया आणि तुम्हाला अंतरल्यामुळे मानसिकदृष्टचा मी पूर्णपणे खचून गेलो आहे......तुमच्याशी आजवर मी कधीच चांगला वागलो नाही......शक्ती हवी. इथलं जीवन कष्टप्रद आहे खरं; पण तोही अनुभव जगण्यासारखा आहे. दुःख सोसण्यातही मजा आहे. धैर्य हवं.

दुसऱ्या दिवशी त्याचा थकवा वाढला. तापही चढला. पेद्रो त्याच्या बिछान्यात निजला. त्याला उब मिळावी म्हणून. (दोघं त्याच्या घराबद्दल, भावी पत्नीविषयी आणि दोघांनी द्यावयाच्या परीक्षेवर बरंच काही बोलले. तो अर्धवट गुंगीत बोलत होता. पुढे वात झाल्यासारखा असंबद्ध वडबडू लागला.

ताप फार वाढल्यामुळे तो कुडकुडत होता. अचानक तो उठला आणि खाली झोपलेल्या मुलांना तुडवत उतरू लागला. पेद्रोनं त्याला घट्ट धरून ठेवलं; पण तो जोरजोरात किंचाळू लागला. 'तुम्ही मला ठार करताय्, रॅफेल मला मारतोय, पेझ माझा खून करतोय्.' शेवटी पेद्रोनं त्याला एक दणका ठेवून दिला, त्यामुळे विचारा बिछान्यावर कोसळला. नंतर कॅनेसानं शिलकी औषधातून लिब्रियम आणि व्हेलियम त्याला दिलं.

दुसरा संपूर्ण दिवस अर्धवट बेशुद्धावस्थेत, अर्धवट वातामध्ये गेला. त्या रात्री इतकी प्रचंड थंडी पडली की त्याला मुलांनी बिछान्यावरून खाली घेतला. तो आता पेद्रोच्या हातांमधे शांतपणे पडून होता. याच स्थितीत तो मरण पावला. मिथॉल आणि झेर्बिनो या दोघांनी त्याला कृत्रिम श्वासोच्छ्वास देण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा काही एक उपयोग नव्हता. पेद्रो ढसढसा रडू लागला. सकाळी मृत शरीर बर्फात टाकण्यापूर्वी त्याचं जाकिट आणि ओव्हरकोट पेद्रोनं स्वतःसाठी काढून घेतला. ◻

## : २ :

नोगायराच्या मृत्यूनं सर्वांनाच मोठा धक्का बसला. 'बर्फाचा कडा कोसळल्यानंतर वाचलेल्या मुलांनी जगावं, अशी देवाचीच इच्छा आहे' या विश्वासाला तडा गेला. सुटकेची हालचाल त्वरित करणं अत्यावश्यक झालं. पहिल्या तुकडीनं लगेच बाहेर पडावं असं सगळ्यांना वाटू लागलं. अधिक उतावीळ होऊन उपयोग नव्हता : कडाक्याची थंडी, जोरदार वारे आणि हिमवर्षाव यामुळे त्यांना बाहेर पडणं अशक्यच होतं.

अलीकडे झोपायच्या जागा नक्की ठरलेल्या नव्हत्या. सर्वांत आधी जो आत शिरे, तो चांगली जागा निवडे. त्यामुळे त्यात शिस्त ठेवायचं ठरलं. आळीपाळीनं उबदार जागा सर्वांना मिळावी असा क्रम ठरला. त्यानुसार मुलं ओळीनं विमानात शिरत. साडेपाच वाजून गेले की अचानक थंडी पडायची. सूर्य शिखराआड गेलेला असायचा. सर्वांत शेवटी आत शिरणाऱ्या जोडीला जास्तीत जास्त थंड ठिकाणी झोपावं लागे. जोडचा ठरून गेल्यासारख्याच होत्या. इन्शार्तेकडे दार बंद करायचं काम नेमून दिलं होतं. त्याबद्दल त्याला रोज उबदार जागी झोपायला मिळे.

ती जागा पायलटच्या केबिनजवळ होती; पण तिथे निजल्यामुळे नवीनच काम इन्शार्तेच्या गळचात पडलं होतं. ते म्हणजे जवळच, पत्र्यामध्ये पडलेल्या भोकातून, प्लॅस्टिकचा, लघवीनं भरलेला मग् रिकामा करणे. तो मग्ही इतका लहान होता की एका मुलाला पाठोपाठ दोन-तीन हप्त्यात त्याचा वापर करावा लागे; पण दुसरं मोठं भांडं नसल्यामुळे काही इलाजच नव्हता. इन्शार्तेला निमूटपणे ते काम करावं लागे. कडक थंडीत पंधरा तास आत अडकून पडावं लागल्यामुळे लघवी लागणंही साहजिक होतं. म्हणून सर्वजण आत शिरण्यापूर्वी तो कार्यक्रम पार पाडत. पुन्हा रात्री नऊच्या सुमारास सामुदायिक 'विधी' उरकून झोपेची आराधना सुरू होई. त्यातही एक-दोनजण पहाटे तीन-चारच्या सुमारास त्रास देतच.

विमानात सर्वत्र अस्वच्छता निर्माण झाली होती. काहीजण रात्री कडेलाच गुपचुप लघवी करत. बर्फ वितळल्यावर ती सुद्धा वितळे. त्याशिवाय हाडं आणि चरबीचेही तुकडे साठले होते. शेवटी, त्या त्या दिवशीच सगळे तुकडे बाहेर फेकले पाहिजेत असा नियम करण्यात आला. आत्यंतिक थंडीमुळेच दुर्गंधी फार येत नव्हती, हे नशीब.

झोप येणंही दुरापास्त होतं. अपुऱ्या जागेमुळे, एकजण हलला की सर्वांना सरकावं लागे. कडा पुन्हा कोसळण्याची भीती होतीच, त्यामुळे स्वस्थपणे झोप लागत नसे. आसपास कोसळणारे कडे किंवा टिंगिरिरिका ज्वालामुखीचा आवाज ही त्यात आणखी भर. दगड उतारावरून घरंगळत त्यांच्या दिशेला येत. असाच एक दगड विमानाच्या पत्र्यावर आदळला. कडाच कोसळला असं समजून इन्शार्ते आणि सॅंबेला ताड्कन उठून बसले. इतरांची झोपही सावध झाली होती. कोणाला गाढ झोप लागलीच तर आजूबाजूला चुकून जरी हातपाय गेले की शेजारच्यांची झोपमोड होई. याच कारणावरून भांडणाला सुरुवात होई. क्वचित मारामारीचे प्रसंगही उद्भवत. कॅनेसा आणि व्हिजिटिन आपल्या ताकदीचा फायदा घेऊन मुजोरी करत पण ते पेरॅडो, डॅनियल वगैरेंना वचकून होते. परिस्थिती आटोक्याबाहेर जाऊ लागली की ते मध्ये पडत. इन्शार्ते आणि तुर्कॅटीनं त्या दोन 'धटिंगणां'शी कायम अबोला धरायचं ठरवलं. त्यावर कॅनेसा म्हणाला, 'गेलात उडत.'

चट्कन सुरू होणारी भांडणं लगेच मिटतही. मग अश्रुपात, आलिंगनं, क्षमायाचना यांना ऊत येई. आपण एकी टिकवली नाही तर सुटका अशक्य आहे, असं ते एकमेकांना वारंवार बजावत.

शिव्याशाप, दमदाटो, तक्रारी आणि भांडणांमुळे त्यांच्यातील नैराश्य काही काळ दूर पळे. प्रत्येकाच्या मनावरचा असह्य ताण तेवढाच कमी होई. त्यातूनही न भांडणारे काहीजण होतेच— विशेषतः फर्नॅंदो पेरॅडो. ही फारच कौतुकाची बाब होती.

एका रात्री इन्शार्तेला स्वप्न पडलं की तो 'ब्यूनोस आयर्स' मधल्या काकांच्या घरी जमिनीवर झोपलाय्. शेजारी मँगिनो आपला सुजलेला पाय घासत पडला होता. झोपेत इन्शार्तेची लाथ त्याच्या पायावर बसली. फिटो आणि कार्लिटसनं खांद्याला हलवून उठवल्यावर त्याच्या लक्षात आलं की स्वप्न खरंच होतं. फक्त फरक म्हणजे तो 'सांगाड्यांतल्या जमिनीवर पडलेला होता. मँगिनो वेदनेमुळे रडू लागला. ◻

## : ३ :

रात्री झोपण्यापूर्वी गप्पागोष्टी चालत असत. अनेक विषयांवर ऊहापोह होई. पण गंमत म्हणजे अन्नपदार्थांवर शेवटी विषय वळे आणि चर्चा समाप्त. अनेक प्रकारच्या पदार्थांचं रसभरित वर्णन ते करत. प्रत्यक्ष ज्याची कमतरता होती, त्यांच्या काल्पनिक मेजवान्या ते झाडत. इचेव्हरनची डेअरी होती. तो दुधाचे अनेक पदार्थ तयार करायच्या पद्धती आणि चवी मुलांना ऐकवी. अशा वेळी इतरांना वाटे की आपल्याला डेअरी काढावी असं पूर्वीच का वाटलं नाही.

मग एकेक जण एका पदार्थांची माहिती देई. जो पदार्थ त्या त्या घरी करण्याचं वैशिष्टय होतं. कधी काळी स्वतः हातानं काही बनवण्याचे केलेले 'प्रयत्न.' मैत्रिणींची त्या क्षेत्रातली 'तयारी.' आजवर खाल्लेले सर्वांत उत्तम पदार्थ. रुचिपालट म्हणून करायच्या डिशेस आणि शेवटी वाईटात वाईट पदार्थ. एकूण विषय खाण्याचा. अशा प्रकारे प्रत्येक मुलानं रोज एक एक खास पदार्थ कल्पनेच्या राज्यात सर्वांना खाऊ घातला. मरणापूर्वी, नोगायराचं मलईदार आटीव दूध, हार्लेची उसळ आणि आइसक्रीम, सँडविचेस, तसेच मांसाहारी पदार्थ, जेली, तळलेले मासे इ. पदार्थांचं त्यांनी आकंठ 'सेवन' केलं.

जेव्हियर आहार-तज्ज्ञ ठरला. तो सर्वांत मोठा होता आणि आजवर त्यानं शेकडो पदार्थ चाखले होते. मॉन्टेव्हिडिओमधल्या सगळ्या उपहारगृहांची यादी करायचं ठरलं तेव्हा— अर्थात त्यांच्या ठळक वैशिष्टयांसह जेव्हियरनंच जास्तीत जास्त माहिती पुरवली. निकोलिशच्या छोटया वहीत इन्शार्ते लिहीत होता. आठवणारं शेवटचं नाव त्यात नोंदल्यावर एकूण संख्या अठ्याण्णव भरली.

नंतर त्यांनी एक स्पर्धाच आयोजित केली. सर्वात उत्कृष्ट 'मेनू'— दारूसह— कोण तयार करतो? पण त्यांच्या लक्षात आलं की अशा काल्पनिक मेजवान्यांमुळे आनंद न मिळता उलट त्रासच होतो.

कच्चं मांस खाताना त्यांना वस्तुस्थितीची जाणीव होऊन अतीव दुःख होई. शिवाय काल्पनिक पदार्थांमुळे उत्पन्न होणाऱ्या पाचकरसामुळे अल्सर होईल अशी धास्तीही त्यांना वाटू लागली. त्यानंतर तसल्या गप्पा बंद झाल्या. फक्त जेव्हियरनं त्या चालू ठेवल्या.

पण मनातून ते विचार कितीही काढून टाकले तरी स्वप्नामध्ये तऱ्हेतऱ्हेचे अन्नपदार्थ येतच राहिले. त्यावर कोणाचाच ताबा नव्हता. कार्लिटसला स्वप्न पडलं की डोक्यावर संत्रं लोंबकळतंय्. ते पकडण्याचा प्रयत्न केला तर हाताला काही लागत नाही. नंतर असं दिसलं की त्यांच्या विमानावर एक उडती तबकडी घिरटया घालतीय्. त्यातून एक शिडी खाली आली. त्यावरून सुंदर दासी उतरतीय्. तिला कार्लिटसनं स्ट्रॉबेरी मिल्क शेक मागितलं; पण त्याऐवजी तिनं स्ट्रॉबेरीवर तरंगत असलेला नुसता पाण्याचा ग्लासच दिला. मग त्या उडत्या तबकडीत शिरून न्यूयॉर्कच्या केनेडी विमानतळावर तो उतरला. तिथे आई आणि आजी त्याला न्यायला आल्या होत्या. वगैरे.

रॉयच्या स्वप्नात बेकरीची दृश्यं दिसली. बिस्किटं भाजून बाहेर पडत होती. त्यानं मालकाला सांगायचा प्रयत्न केला की 'आम्ही अँडीजवर अडकून पडलो आहोत; पण मालकाला काहीच कळलं नाही.

आपापल्या कुटुंबाबद्दल बोलावं असं त्यांनी ठरवलं. त्यानंतर कार्लिटस रोज चंद्राकडे बघत बसे. आई-वडीलही त्या वेळी त्याच चंद्राकडे बघत असतील या विचारामुळे त्याच्या मनाचं किंचित समाधान होई. पडल्यापडल्या, त्याच्या जागेजवळ खिडकी नसल्यामुळे, त्याला बाहेरचं दिसत नसे. म्हणून फिटोनं त्याला एक छोटा आरसा दिला. किरण परावर्तित होऊन मग त्याच्या आवडत्या चंद्राचं दर्शन त्याला होई.


घरादाराच्या विचारांमुळेही दुःखाचे उमाळे येतच राहिले. मनःस्थिती ढासळू न देणं ही तारेवरची कसरतच होती. त्रास देणारे विचार कटाक्षानं दूर ठेवावे लागत.

बाकी बोलायला विषयच नव्हते. युरुग्वेच्या धोरणाबद्दल चर्चा करण्यात बऱ्याच जणांना रस होता; पण नोगायराच्या निधनानंतर त्या विषयामुळेही कोणाच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत म्हणून काळजी घ्यावी लागे. रेडिओवर बातम्या तेवढ्या ऐकायला मिळत.

सगळ्यात बिनधोक विषय होता शेती. प्रत्येकाची थोडीफार शेती होती. पूर्वीचा अनुभव होता. त्या निरुपद्रवी विषयाची माहिती देण्यात कोणाचंही नुकसान नव्हतं. भावना दुखावण्याचा प्रश्न नव्हता.

काही वेळा पेट्रोला अगदी एकटं पडल्यासारखं वाटे. देशातल्या घटनांबद्दल त्याला काहीसुद्धा ज्ञान नव्हतं, कारण वाचन बेताचं. म्हणून मुलांनी त्याला शेतीच्या 'कामात' गुंतवलं. सध्या त्यांनी 'विभागीय प्रायोगिक शेती'ची स्थापना केली होती. सर्वजण मनानं त्या भूमीतच वावरत. पेट्रोकडे ससे सांभाळायची 'जबाबदारी' होती. एडचुअर्डोनं काढलेल्या नकाशांवरून कार्लिटसनं छोटीछोटी घरं 'बांधली'

सर्वांना सामुदायिक शेतीबद्दल अतिशय अभिमान होता. जेव्हियर आणि पेरॅडो एक उपहारगृह चालवत होते. एकदा रात्री ते झोपेच्या

तयारीत असताना जेव्हियरनं डॅनियलला विनंती केली, 'मला झेर्बिनोशी थोडं खाजगी बोलायचंय्. प्लीज बाजूला सरकतोस का?' अशा रीतीनं आणखी चारपाच जणांना बाजूला करून त्यानं झेर्बिनोच्या कानात काय सांगितलं तर 'उपहारगृहाचे वार्षिक हिशेब करून देशील का? ताळेबंदच हवा.'

हे सर्व 'व्यवहार' मनापासून चालले होते. थट्टामस्करीला अजिबात वाव नव्हता. संध्याकाळी मैत्रिणींसह ते जेव्हियरच्या उपहारगृहात नेमानं जात. शुद्ध आणि आदरयुक्त भावना सर्वत्र नांदत होती. ईश्वराच्या अस्तित्वाविषयी कोणाच्याच मनात शंका उरली नव्हती. क्षुल्लक पाप जरी हातून घडलं तरी मृत्यू झडप घालील अशी त्यांना खात्री होती. मुख्य म्हणजे 'सेक्स'च्या भावना नाहीशा झाल्यासारख्या होत्या. कडक थंडी आणि अशक्तपणा ही त्याला कारणं होतीच. अपुऱ्या आहारामुळे आपण नपुंसक बनू अशी भीतीही कित्येकांना वाटू लागली.

पण अशा वेळी आयुष्यात चांगल्या स्त्री-साथीदाराची आवश्यकताही प्रकर्षानं भासू लागली. सुखदुःखांत पूर्णपणे सहभागी होणारी, भावना पूर्णपणे समजून घेणारी सहचारिणी. निकोलिश आणि नोगायरा यांची पत्रं पालकांपेक्षा प्रेयसींना उद्देशूनच अधिक होती. ज्यांची लग्नं पूर्वीच ठरली होती, त्या डॅनियल, इन्शार्ते, पँको, रॅफेल, कॅनेसा, मँगिनो या मुलांनी जिवंत राहिलो तर आयुष्यभर पत्नीशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतली. पेट्रो सँटियागोमधल्या प्रेयसीला विसरून गेला होता. युरुग्वेत परतल्यावर ताबडतोब लग्न ठरवणार होता. झेर्बिनो अजून कुठेच 'अडकला' नव्हता; पण ओळखीच्या एका मुलीशी संबंध जोडता येईल असं तो सांगे.

परिस्थितीच्या गांभीर्यामुळे जीवन-मृत्यू या विषयावर फार खोलात जाऊन चर्चा होत नसे. इन्शार्ते, झेर्बिनो आणि अल्गोर्ता या तीन प्रागतिक विचारांच्या मुलांनी 'धार्मिक श्रद्धा आणि राजकीय जबाबदारी' ह्या विषयावर काही मतं ठामपणे मांडली. असंच एकदा पेट्रो आणि फिटो 'अस्तित्व आणि ईश्वराचे स्वरूप' यावर बोलले. माणसाचं नशीब ईश्वर घडवतो यावर त्यांचा अजिबात विश्वास नव्हता. दोन जणातील प्रेमाचं नातं किंवा मानवजातीवरील प्रेम म्हणजेच पेट्रोच्या मते देवाचं अस्तित्व. थोडक्यात प्रेमाला असाधारण महत्त्व होतं.

वाचायला एक-दोन पुस्तकांखेरीज काहीच नव्हतं. तीही विनोदी कथांची पुस्तकं. खेळ, गाणी किंवा कथाकथन केव्हाच बंद पडलं होतं. चर्चेचा मुख्य विषय आता होता 'सुटका.' त्यावर पुनःपुन्हा विचारविनिमय होई. तयारी कोणती करायची, मार्ग कोणता याबाबत नवनवीन कल्पना निघत. पहिल्या तुकडीतले लोक बहुमतानं ठरलेली योजना तंतोतंत पार पाडतील याविषयी कोणाच्याच मनात शंका नव्हती. पायांचं संरक्षण कसं करायचं, चिलीत पोचल्यावर आधी काय करायचं, आई-वडिलांशी फोनवरून काय बोलायचं या अनेक प्रकारच्या विषयांमुळे चैतन्य निर्माण होई. त्यांनी असा विचार केला की मॉन्टेव्हिडिओला परतल्यावर एक लेखक गाठावा आणि वर्तमानपत्रासाठी त्याला सगळे अनुभव ऐकवावे. सर्वांनी मिळून एक पुस्तकही लिहायचं ठरलं. कॅनेसानं त्याचं नावही निश्चित केलं– 'मे बी टुमॉरो' (कदाचित् उद्याचा दिवस पाहू) आशा अमर आहे. ती कोणीच सोडली नव्हती. मधून निराशेचे झटके यायचे त्याला इलाज नव्हता. रोज रात्री सर्वांच्या सुरक्षिततेसाठी प्रार्थना चालूच होती. तेवढाच दिलासा मिळे. बाहेर मोठं वादळ चालू झालं की बर्फाचे कडे कोसळण्याची सर्वांना धास्ती वाटे. एकदा असंच वादळ घोंघावत होतं आणि धडधडत्या अंतःकरणानं प्रार्थना पुरी करताच ते एकदम शांत झालं. देवावरची श्रद्धा अशामुळेच वाढते.

फिटो मात्र संशयवादी होता. रात्रीच्या प्रार्थनेला तो झोपेची गोळी समजे. सातत्यामुळे आणि कमकुवत मनाच्या लोकांना आवश्यक असलेली अतिमानवी, पण भ्रामक शक्ती त्यापासून मिळाल्यामुळे आपोआप झोप लागते असा त्याचा दावा होता. सगळेजण ते ओळखून होते. एका रात्री मुलांनी त्याला 'धडा' दिला. टिन्गिरिका ज्वालामुखीची अंतर्गत जोरदार हालचाल होत असल्यामुळे जमीन भूकंपासारखी थरथरू लागली. सर्वांच्या पोटात भीतीचे गोळे उभे राहिले. वरून मोठमोठ्या शिळा गडगडत येऊन कपाळमोक्ष होणार याविषयी खात्री वाटू लागली. बर्फात आपोआपच कबर तयार होणार होती. मुलांनी प्रार्थना–पुस्तक फिटोच्या हातात दिलं आणि सुरुवात करायला सांगितली. तोही इतका घाबरून गेला होता की इतरांसारख्याच पूर्ण श्रद्धेनं त्यानं प्रार्थना सांगितली. 'ज्वालामुखीपासून आम्हाला वाचव, ईश्वरा!' आणि आश्चर्य म्हणजे त्याची प्रार्थना संपताच थरथराट एकदम थांबला. ◻

## : ४ :

पेरॅडो, कॅनेसा आणि व्हिझिंटिन धूम्रपान अजिबात करत नव्हते. झेर्बिनोला आधी सवय नव्हती; पण पर्वतावर ती चिकटली. बाकी सगळे एकजात अखंड यज्ञ चालू ठेवत. मनावरचा वाढता ताण हे त्याचं मुख्य कारण. सिगारेट्सची कमतरता नव्हती. कारण चिलीमधे त्या महाग असल्यामुळे जेव्हियर आणि एवलनं त्यांचा पुरेसा साठा बरोबर घेतला होता.

तरीही नियंत्रित पुरवठा चालू होता. प्रत्येकाला दोन दिवसांसाठी वीस सिगारेट्चं पाकीट मिळे. म्हणजे रोज दहा पुरवायच्या. तरी इन्शार्ते, डेलगॅडो दिवसातच वीस फस्त करायचे. मग दुसऱ्या दिवशी त्यांची फार पंचाईत व्हायची. त्यावर उपाय म्हणजे त्यांच्या वाट्याच्या आगाऊ मागणे किंवा मित्रांकडे याचना करणे.

सकाळ झाली की पडल्या पडल्या एक सिगारेट ओढायची. मग शेजाऱ्याला म्हणायचं: 'छान हवा दिसतीय्, तू बाहेर का पडत नाहीस?'

'मग तूच का जात नाहीस?'

काही वेळानं कोणी तरी उठायचं, बूट सापडवून घालायचे. दारात रचलेल्या बॅगा बाजूला सारून खाली उडी घ्यायची. मागून एक-एक करून सगळे आपापल्या गाद्या घेऊन बाहेर जात. विमानाच्या छतावर त्या वाळत टाकत. अंगातले कपडे बदलण्याचा प्रश्नच नव्हता, म्हणून तेही वाळवावे लागत. शेवटी बाहेर येणाऱ्याला सगळी आवराआवर करावी लागे.

थोड्या वेळानं स्ट्राऊचबंधू मांस कापायच्या तयारीला लागत. काहीजण टाकून दिलेल्या तुकड्यांमधे मांसाचे अवशेष मिळतात का याचा शोध घेत. तोपर्यंत ठराविक ठिकाणी मुलं शौच उरकण्याचा प्रयत्न करीत.

सगळ्यांची पचनशक्ती पार बिघडली होती. काहीजणांना बद्ध-कोष्ठ तर काहींना नंतर जुलाब होऊ लागले. दोन–दोन, तीन–तीन दिवस काही व्हायचंच नाही. आतडी तुटतायत् की काय अशी शंका यायची. हलका कोठा असलेल्या मुलांना कच्चं मांस पचत नसे. सतत शौचाला जावं लागल्यामुळे दिवसेंदिवस त्यांचा अशक्तपणा वाढू लागला. मागे सांगितल्याप्रमाणे जेव्हियर चरबीचं तेल सौम्य रेचक म्हणून देऊ लागला.

ही परिस्थिती फार वाईट होती. त्याला विनोदी वळणही मिळे. सर्वांत उशिरा कोण जाईल यावर पैजा लागत. अठ्ठावीस दिवसांनंतर पेझला, बत्तीस दिवसांनंतर डेल्गॅडोला आणि सर्वांत उशीरा चौतीस दिवसांनी बॉबी फ्रँकॉइसला नियमितपणे जायची सवय लागली, असं म्हणण्यापेक्षा त्यांच्या पोटाला अन्नाची सवय झाली.

त्यावर कळस म्हणजे जुलबाची साथ सुरु झाली. त्यातून अल्गोर्ता फक्त बचावला. चरबीसेवनामुळे ती त्रास होतो असं मत पडलं. ही त्यांच्या दुर्दैवात भरच होती.

एकदा रात्री अत्यंत घाईघाईमधे कॅनेसा विमानाबाहेर धावला, तेव्हा आणखी सहा आकृत्या जवळपास बसलेल्या त्याला चंद्रप्रकाशात दिसल्या. त्याला वाटलं, सर्वांचा शेवट आता निश्चित जवळ आला. त्यानंतर रात्री तो कधीच बाहेर पडला नाही. सरळ ब्लँकेटमधे तो गुपचुप ' विधी ' उरकू लागला. त्यामुळे साहजजिकच इतरांचा संताप झाला; पण त्याच्या आडदांडपणापुढे कोणाचाच इलाज चालला नाही. त्याच्या या पराक्रमामुळे काही वेळा इतरांचे हात ' भरले. ' पण करतात काय विचारे !

हगवणीमुळे सॅबेला सगळ्यात हैराण झाला. दिवसेंदिवस तो अशक्त होत गेला. शेवटी तर शुद्धच हरपली. इतर मुलांना ती धोक्याची सूचना ठरली. कॅनेसानं चरबी न खाण्याचा सल्ला दिला, मांसही बेताबेतानं खायचं ठरलं. सॅबेला रोज दहा पावलं तरी चालायचा. नुसतं पडून राहिलं म्हणजे प्रकृती अधिक ढासळायला वेळ लागणार नाही हे तो ओळखून होता. अन्न वर्ज्य करणंही त्याला मान्य नव्हतं; पण स्ट्राउचबंधूंनी ते मात्र तोडलं आणि सक्तीची विश्रांती घ्यायला लावली.

दुसऱ्या दिवशी तो शौचाला जाऊन आल्यावर आजार नाहीसा झाल्याची सुवार्ता त्यानं दिली; पण झेर्बिनोला तो विसरला होता. एक तर झेर्बिनो ' डॉक्टर ' होता आणि त्याची सॅबेलावर पाळत होती. ढोंग उघडकीस आलं आणि त्या दिवशीही त्याला अन्न मिळालं नाही.

या उपाययोजनेचा फायदा नक्कीच झाला आणि तो ताळ्यावर आला. हळूहळू त्याची ताकद परत यायला लागली. ◻

## : ५ :

पंधरा नोव्हेंबर हा दिवस जसजसा जवळ येऊ लागला, तसतसं विमानातील वातावरण उत्तेजित आणि आशादायक बनू लागलं. फोनवरून पालकांशी आधी काय बोलावं याच्या अनेक रंगीत तालमी झाल्या. मेंडोझाला पोचल्या–पोचल्या कोणते पदार्थ चापायचे तेही ठरलं. त्यानंतर ब्यूनोस आयर्सपर्यंत बस पकडायची. पुढे प्लेटनदी बोटीतून पार करायची. जाताना आई-वडलांसाठी आठवणीनं भेटवस्तू विकत घ्यायच्या.

पहिल्या तुकडीतल्या मुलांपुढे थंडीचं संकट उभं होतं–इतरही अनेक प्रश्न होते. प्रत्येकी तीन विजारी, टी-शर्ट, दोन स्वेटर्स, एक ओव्हरकोट आणि तीन उत्कृष्ट गॉगल्स जमा झाले होते. व्हिंजिटिननं वैमानिकांचं शिरस्त्राण ताब्यात घेतलं. एका विजारीपासून कॅनेसानं पिशवी तयार केली. शिवाय व्हिंजिटिननं सीट-कव्हरपासून सहा–बोटं नसलेले–हातमोजे बनवले

आधीच्या अनुभवावरून, पायांचं संरक्षण हा मुख्य प्रश्न होता. रग्बीचे बूट होते; पण जाड पायमोजे नव्हते. त्यातून अशी कल्पना निघाली की बाहेरच्या प्रेतांची चरबी आणि त्वचा वापरून पाया-खाली त्याचा थर ठेवावा. मनगटाजवळच्या त्वचेचा बरोबर मोज्या-सारखा उपयोग होणार होता.

निघायचा दिवस जवळ आल्यावर तुर्केटीच्या पायानं त्रास द्यायला सुरुवात केली. सूज आणि सेप्टिक; पण न्यूमानं तिकडे दुर्लक्ष केलं. मार्ग कोणता घ्यायचा हे ठरवण्यातच त्यांची मनं गुंतली होती. आता-पर्यंत, दोन शंका निर्माण करणाऱ्या गोष्टी माहीत झाल्या होत्या. ' क्युरिको मागे टाकलं ' असं वैमानिक म्हणाल्याचं त्यांना आठवत होतं. ते येतं चिलीमधे. चिली पश्चिमेला. सगळं पाणी अखेर समुद्राला मिळतं हेही त्यांना ठाऊक होतं आणि अद्याप सुस्थितीत असलेलं विमानाचं होकायंत्र दरीची पूर्वदिशा दाखवत होतं.

समाधानकारक संभाव्य उत्तर असं काढलं की दरी ईशान्येकडून पर्वताला वळसा घालून पश्चिमेकडे वळत असणार. म्हणून वरकरणी चिलीपासून दूर जावं लागत असलं तरी मुलांनी दरी उतरायचं नक्की केलं. पाठीमागचा पर्वत इतका उंच होता की तो ओलांडून जायचा विचारसुद्धा अशक्य होता. पश्चिमेला जाण्यासाठी पूर्वेकडूनच मार्ग होता.

अखेर १५ नोव्हेंबरची पहाट उजाडली. सर्व मुलं आधीच उठून चारीजणांच्या दिमतीला तयार होती. थोडं बर्फ पडत असूनही सात वाजता चौघंजण बाहेर पडले. पेरॅडोनं मूळचे बूट विमानातच ठेवून लाल जोड चढवला होता. ' मी ते घ्यायला लवकरच येईन, त्यांना कोणीही हात लावू नका. ' अशी सूचना त्यानं दिली होती आणि कल्पनेपेक्षाही फारच लवकर तो परतला. हिमवर्षावाचा जोर वाढल्यामुळे तीन तासांनंतर त्यांना मागे फिरावं लागलं.

पुढचे दोन दिवस हवा तशीच खराब राहिली. वादळ, वर्षाव पूर्वीसारखाच जोरदार. पेद्रोचं भविष्य खोटं ठरलं होतं. १५ तारखेला उन्हाळा काही सुरू झाला नाही. त्याला ओशाळल्यासारखं वाटू लागलं. वाट पाहण्यात जादा दिवस गेल्यामुळे इकडे तुर्केटीच्या

पायांची स्थिती गंभीर झाली. दोन गळवं झाल्यामुळे पाऊलही टाकता येईना. त्यातील पू कॅनेसानं दाबून काढला. वेदना खूपच होत होत्या. त्याला मोहिमेत भाग घेता येणार नाही असं सांगितल्यावर मात्र तो चिडला. आपण ठीक आहोत असं आवर्जून तो सांगत होता; पण त्यात काहीच अर्थ नव्हता. बहुमताचा निर्णय त्याला मानावाच लागला. शुक्रवार दि. १७ ची सकाळ. ते जागे झाले तोपर्यंत आकाश स्वच्छ झालं होतं. आता थांबायचं कारणच नव्हतं. सर्व सामानासह सुसज्ज होऊन तुकडी बाहेर पडली. मांस, पाण्याची बाटली, सीट-कव्हर्स आणि एक रग्.

राहिलेली मुलं त्यांना निरोप द्यायला विमानाबाहेर उभी होती. पेरॅडो, कॅनेसा आणि व्हिजिटिन क्षितिजावर अदृश्य झाल्यावर त्यांच्यात पैजा सुरू झाल्या; आपल्या जगात ते कधी पोचतील? अँडीजवर अडकून पडल्याला पाच आठवडे लोटले होते. अजून तीन आठवड्यांच्या आत ते सर्व मांटेव्हिडिओमध्ये दाखल होतील असा विश्वास प्रकट करण्यात आला. तिथे ९ डिसेंबरला पेरॅडोचा वाढदिवस थाटात साजरा करायचा असं केव्हाच ठरलं होतं. प्रत्येकानं स्वतंत्र पदार्थ आणायचे ते निराळंच. चिलीमध्ये तर ते हा हा म्हणता पोचतील. अल्गोर्ताच्या [illegible] मंगळवारी; तुर्केटी आणि फ्रँकॉईस बुधवारी म्हणाले तर काहीजणांना वाटलं गुरुवारी. मँगिनो ठामपणे म्हणाला, ‘आपल्याला इथून न्यायला सकाळी दहा वाजता पथक येईल.’ कार्लिटसला तेच साडेतीन वाजता वाटत होतं. निराशावादी सॅवेला म्हणाला, ‘अजून दहा दिवसांनी, रविवारी सकाळी दहा वीसला आपण तिथे पोचू. त्याआधी मुळीच नाही. पैज आपली.’ □

## : ६ :

कॅनेसा सर्वांत पुढे होता. सूटकेसवर सामान रचून ते बर्फावरून ओढत नेणं सोयीचं होतं. टणक बर्फ वितळल्यावर पायाखाली वापरण्यासाठी कुशन होत्याच. मागोमाग व्हिजिटिन रग पाठीवर टाकून चालला होता. त्याच्या पाठीमागे पेरॅडो.

ईशान्येच्या दिशेनं त्यांनी वेगात अंतर काटलं. उतारावरून जाताना रग्बी बूट बर्फावर चांगली पकड घेत होते. कॅनेसा बराच पुढे गेला. दोन तासांनंतर त्यानं जोरजोरात हाका मारायला सुरुवात केली. लवकर जवळ येण्याची दोघांना तो खूण करत होता. त्याला गाठल्यावर तो म्हणाला, ‘मी तुम्हाला चकित करणार आहे.’

‘कशामुळे?’ पेरॅडोनं विचारलं.

‘विमानाचं शेपूट.’

पेरॅडो आणि व्हिजिटिन समोरच्या उंचवट्यावर चढले. खरोखर शंभर यार्डांवर फेअरचाइल्डचं शेपूट पडलेलं होतं. बाजूचे दोन्ही पंख दिसत नव्हते; पण मधला भाग जसाच्या तसा होता. सगळ्यात आनंदाची गोष्ट म्हणजे त्यांच्या सूटकेसेस्. त्या इतस्ततः विखुरलेल्या होत्या. तिघंही जोरात धावले. त्या उघडल्या आणि आत शोध घेऊ लागले. त्यांना जणु काही खजिनाच गवसला होता. जीन्स, स्वेटर, मोजे, बर्फावरून चालण्याच्या वस्तू. एवलच्या बॅगमध्ये तर चॉकलेटचा डबाच सापडला. लगेच त्यांनी प्रत्येकी चार फस्त केली; पण नंतर हात आवरला.

मग अंगातले कित्येक दिवसांत न काढलेले कपडे काढून टाकून नवे अंगात चढवले. त्यातल्या त्यात जास्त ऊब मिळेल असे. कॅनेसा आणि पेरॅडोनं ‘कातडी’ पायमोजे बाजूला फेकून दिले. आता भरपूर लोकरी पायमोजे होते. प्रत्येकी तीन तीन जोड त्यांनी घेतले.

खुद्द शेपटात शिरल्यावर एक साखरेचं पाकिट आणि तीन मांसाची पॅस्टीज मिळाली. ती लगेच फस्त. साखर मात्र शिलकीत ठेवली. आणखी तीन सूटकेसेस आत दिसल्या. त्यात एक रम्ची बाटली आणि सिगारेट्सची भरपूर पाकिटं सापडली.

मेकॅनिक रोकनं सांगितलेल्या बॅटऱ्या एका पेटीत आढळल्या. शिवाय आणखी काही कोका–कोलाची खोकी आणि पुस्तकं. मग कॅनेसा बरोबर आणलेलं मांस भाजायच्या उद्योगाला लागला. राहिलेले दोघं शोध घेत बसले. त्यांना नशिबानं काही सँडविचेस मिळाली. एकत्र बसून त्यांनी भाजलेलं मांस, चमचाभर साखर आणि घोटभर रम या पदार्थांचा समाचार घेतला. इतकी सुंदर मेजवानी आजवर कधीच मिळाली नाही, असं त्यांना वाटलं.

सूर्य शिखराआड गेल्यामुळे थंडी वाढली. झोपायला आता आडोसा होता. सामानाच्या जागेत त्यांनी सगळे कपडे पसरले. बॅटरीचा वापर करून एक छोटा दिवाही लावला. उघड्या बाजूला सूटकेसेस् रचून ठेवल्या आणि खाली आडवे झाले. उजेडामुळे त्यांना लहान मुलांची पुस्तकं वाचता आली. आत भरपूर ऊब आणि आराम वाटत होता. नऊ वाजता कॅनेसानं दिवा मालवला. खाणं भरपूर झालं होतं त्यामुळे त्यांना गाढ झोप लागली.

सकाळी बर्फ कोसळतच होता; पण पिशव्यांत सामान भरून ते तयार झाले. नियोजित मार्गानं पुन्हा प्रवास सुरू झाला. डावीकडे पर्वताच्या प्रचंड रांगा होत्या. पश्चिमेला पोचण्यासाठी कमीत कमी तीन दिवस चालावं लागेल, असा त्यांनी अंदाज केला.

बर्फ पडायचं थांबलं, आकाश स्वच्छ झालं आणि हवा तापू लागली. अकराचा सुमार. ऊन पाठीवर पडत होतं आणि बर्फामुळे चेहऱ्यावरही परावर्तित होत होतं. अंगातले कपडे कमी करण्यासाठी थांबावं तरी खूप शक्ती खर्च होणार आणि ते पुन्हा बरोबर बाळगावे लागणार! ‘नकोच झालं.’

दुपारी एका मोठ्या खडकाशी ते पोचले. त्यातून पाणी झिरपत होतं. झरा नाही म्हणता येणार; पण छोटी धार होती. थोडा वेळ तिथे विश्रांतीसाठी थांबून पुढे जावं असं त्यांनी ठरवलं. सोबत आणलेल्या धातूच्या सळईचा वापर करून ब्लँकेटचा तंबू उभारला. उन्हापासून रक्षण. जवळचं थोडं मांस खाऊन झाल्यावर व्हिजिटिन पाणी प्यायला गेला; पण ते काळपट दिसत होतं. म्हणून बर्फ वितळून घ्यायचंच ठरलं.

सावलीत पडल्या पडल्या समोर त्यांना अजस्र पर्वत दिसत होता. तिथपर्यंत किती अंतर असेल याचा मुळीच अंदाज लागत नव्हता. प्रकाश कमी झाल्यावर तो दूर वाटू लागला. लांबवरच्या सावल्या पाहून, दरी तिथून पश्चिमेकडे वळेल असं वाटत होतं. कॅनेसा जितका बारकाईनं शोध घेऊ लागला तसा त्याचा गोंधळ वाढतच गेला. दरी पूर्वेकडेच जाण्याची शक्यता अधिक होती; ‘जितकं पुढे जाऊ, तसं

अँडीजमधेच आपण घुसू काय ?' हा प्रश्न त्याला पडला; पण त्या वेळी दोघांजवळ तो काही बोलला नाही.

ते थकलेले होते. सूर्यही तळपत होता; पण नेहमीप्रमाणे तो अदृश्य झाल्यावर तपमान गोठणबिंदूच्या खाली गेलं. उजेडही नाहीसा झाला. त्याच ठिकाणी रात्र काढावी असा त्यांनी निर्णय घेतला. बर्फात लहानसा खड्डा खणून त्यांनी थंडीपासून बचावाची सिद्धता केली. त्यात पडून वरून ब्लॅंकेट्स पांघरली.

थंडी सोडली तर रात्र सुंदर पडली होती. उंचीमुळे डोक्यावर अगणित तारे चमचमताना दिसत होते. हवा स्थिर होती. रात्र जसजशी वाढू लागली तसतसं तपमान मात्र खाली जाऊ लागलं. तिघंही पार गोठून गेले. कपडे आणि ब्लॅंकेटचा काही उपयोगच वाटत नव्हता. निराश होऊन ते एकमेकांच्या अंगावरच पडले. सगळ्यात खाली व्हिजिंटिन, मधे पेरॅंडो आणि वरती कॅनेसा. या पद्धतीनं ऊब मिळवायचा प्रयत्न केला; पण झोप जवळजवळ लागलीच नाही.

दुसऱ्या दिवशी सूर्य उगवेपर्यंत कॅनेसा आणि पेरॅंडो जागेच होते. 'छे, कठीणच आहे.' कॅनेसा म्हणाला, 'कालच्यासारखी रात्र पुन्हा आज पडली तर आपण काही जिवंत राहत नाही.'

पेरॅंडो उभा राहिला. ईशान्येकडे पाहून म्हणाला, 'पण आपल्याला जायलाच पाहिजे. ते सगळे आपल्यावर विसंबून आहेत.'

'आपण बर्फात मरून पडलो तर त्यांना काय उपयोग होणार ?'

'मी तरी जाणारच.'

'ते बघ.' पर्वताकडे बोट दाखवून कॅनेसा म्हणाला, 'तिथून वाटच नाही. दरी सरळ पूर्वेकडेच जाते. आपण विरुद्ध दिशेनं अँडीजमधेच शिरतोय.'

'तुला ठाऊक नाही. आपण जाऊन बघू–'

'मूर्खासारखं करू नकोस.'

पुन्हा त्या दिशेला पाहिल्यावर उत्साहजनक काहीच पेरॅंडोला आढळलं नाही. 'मग आपण काय करावं असं तुझं म्हणणं आहे ?' त्यानं विचारलं.

'शेपटापाशी परतू या. तिथून बॅटऱ्या घेऊन विमानाकडे रवाना होऊ. आपल्याला रेडिओ चालू करता येईल. रोकू नाही का म्हणाला ?'

पेरॅंडो संभ्रमात पडला. त्यानं व्हिजिंटिनकडे पाहिलं. नुकताच तो उठला होता. 'तुझं काय मत आहे टिटिन ?'

'काही नाही. तुम्ही ठरवाल तिकडे मी येईन.'

'पण कुठे जायचं हा प्रश्नच आहे. पुढे गेलं तर ?'

'चालेल की.'

'का मागे फिरून रेडिओ सुरू करायचा प्रयत्न करावा ?'

'हां. आपण तसंच करू.'

'म्हणजे कसं ?'

'तुम्ही म्हणाल तसं.'

पेरॅंडोला त्याचा राग आला. त्याला नक्की कुठली तरी बाजू घ्यायला त्यानं सांगितलं. शेवटी व्हिजिंटिननं कॅनेसाचीच बाजू घेतली. कारण तो म्हणाला, 'आकाश स्वच्छ असताना आपली काल रात्री काय दशा झाली ? आज जर वादळ झालं तर ? म्हणजे आपण आत्महत्याच केल्यासारखं होईल.'

शेपटाच्या दिशेनं त्यांचा उलटा प्रवास सुरू झाला. उतरण्यापेक्षा चढणं फारच अवघड; पण धापा टाकून दुपारपर्यंत ते शेपटापर्यंत पोचले आणि कपडयांच्या ढिगाऱ्यावर एकदाचे जाऊन कोसळले. आडोसा होता. सुखदायक ऊबही. ती 'श्रीमंती' व्यवस्थाच होती. दिवसा उन्हापासून आणि रात्री थंडीपासून संरक्षण. दोन दिवस तिथेच मुक्काम करावा असा त्यांना मोह पडला; पण मांसाचा साठा तुटपुंजा असल्यामुळे फेअरचाइल्डकडे जाणं हिताचं, असं त्यांनी ठरवलं. पेरॅंडोनं बॅटऱ्या ताब्यात घेतल्या.

सूटकेसवरच बॅटऱ्या ठेवून ती ओढायचा प्रयत्न केला; पण जमेना. त्या वजनदार होत्या. चढ ४५ अंशांचा होता. त्या परिस्थितीत विमानापर्यंत बॅटऱ्या नेणं अशक्य होतं; पण त्यांनी धीर सोडला नाही. फेअरचाइल्डमधून संदेश-रेडिओ अलग करून तो तिथपर्यंत खाली नेणं जास्त सोपं जाणार होतं. शेवटापर्यंतचं अंतर आवाक्यातलं होतं.

बॅटरीखेरीज इतर सामान बॅगेत भरलं. मुलांसाठी भरपूर कपडे घेतले. पेरॅंडोनं पत्र्यावर नेल-पॉलिशनं लिहिलं, 'वर जा. अठरा लोक अजूनही जिवंत आहेत.' शेपटीच्या आणखी दोन भागांवर त्यानं तोच संदेश लिहून ठेवला. कॅनेसाला एक औषधाची पेटीही सापडली होती. सॅबेला आणि झेर्बिनोला झालेल्या दम्यावर उपयोगी पडेल असं 'कॉर्टिसोन' नावाचं गुणकारी औषध त्यात होतं. इतरही बरीच होती.

दोघंही बाहेर येऊन पाहतात तर व्हिजिंटिन थोडा पुढे गेला होता आणि त्याच्या धांदरटपणात सूटकेस मोडली होती. पॅरॅंडो एकदम भडकलाच. त्यानं व्हिजिंटिनला हजारो शिव्या दिल्या. बिचारा गप्प उभा होता; पण कॅनेसानं आवश्यक दुरुस्ती केल्यावर काम चालू झालं. मऊ बर्फात पाय रुतवत अखेर ते साथीदारांकडे निघाले. ¤

## : ७ :

मोहिमेसाठी तिघांनी विमान सोडल्यानंतर बाकीच्या मुलांमध्ये चैतन्य संचरलं होतं. सुटकेसाठी काही तरी हालचाल सुरू झाली, त्यामुळे त्यांच्या मनावरील ताण हलका झाला होता. आता मदत घेऊनच तिघं परततील असा त्यांचा विश्वास होता. त्याशिवाय तीन जागा रिकाम्या झाल्यामुळे विमानात पुरेशी मोकळी जागा झाली होती. झोपायला जास्त जागा आणि कॅनेसा, व्हिजिंटिनचा ताप नव्हता.

मॅंगिनोला कॅनेसाची उणीव भासत होती. कारण त्याचा त्याला आधार होता; पण अलीकडे त्याची वागणूकही खूप सुधारली होती. संकटाच्या गांभीर्यामुळे पूर्वीचा आक्रस्ताळेपणा आठवून त्याला लाज वाटे. ज्या जेव्हियरशी त्याचं मुळीच पटत नव्हतं, त्याच्याजवळ पश्चात्तापानं मॅंगिनो म्हणाला, 'मी पूर्वी फारच वाईट वागलो. घरी किंवा इथेही. या इथे लक्षात येतंय की त्या वेळची वागणूक किती भयानक होती. भावानं त्रास दिला की मी त्याला चक्क लाथा मारायचो. सूपची चव थोडी जरी बिघडली तरी भांडं भिरकावून द्यायचो. पुन्हा घर दिसतं की नाही देव जाणे !

त्यांची अंतर्बाह्य शुद्धी होत होती. हा अनुभव पूर्णतया नवीन

होता. त्यांना ख्रिस्ताचे वाळवंटातील चाळीस दिवस आठवले. त्यांची सत्त्वपरीक्षा लवकरच संपेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. यातनांमुळे त्यांच्यात चांगलं परिवर्तन घडलं होतं. मतभेद, भांडणं टाळायचा ते आटोकाट प्रयत्न करीत. एकमेकांवर प्रेमाचा वर्षाव होऊ लागला. सुटकेच्या एकमेव ध्येयामुळे त्यांच्यात एकोपा निर्माण झाला होता. विशेषतः रात्री प्रार्थना करताना गूढ-गंभीर वातावरण पसरे. ईश्वराचं अस्तित्व त्यांना जाणवल्याचा भास होई. त्या वेळची शांतता एकाग्रचित्त करी.

न्यूमा तुर्केटीचं अवसान मात्र ढासळू लागलं. मोहिमेवर जाता न आल्यामुळे त्यांची घोर निराशा झाली होती. त्याचा राग इतरांवर न काढता तो स्वतःवरच काढू लागला. अशक्तपणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून त्यानं जीविताची आशाच सोडली. वाटचाला आलेलं अन्न तो संपवेना. आधीच कच्च्या मांसाची त्याला शिसारी होती; केवळ मोहिमेसाठी शक्ती हवी म्हणून नाइलाजानं तो पुरेसं खात असे. ती गरज संपल्यावर खाण्याचं प्रयोजनच संपलं. स्ट्राऊचबंधूंनी बळजबरी केली की तो मांस लपवून ठेवी. केवळ खाल्ल्याचं नाटक करी.

साहजिकपणे त्याची प्रतिकारशक्ती कमी झाली. सुजलेल्या पायाचं विष सोसेना. कॅनेसाच्या ऑपरेशन' मुळे पू निघून गेला; पण सूज मात्र अधिकच पसरली होती. त्याची हालचाल मंदावली. तो फक्त बर्फ वितळवे. मनाच्या दौर्बल्यानं शारीरिक थकव्यापुढे आघाडी मारली. पुढे तो उभं राहण्यासाठीही फिटोची मदत मागू लागला; पण तेवढी ताकद त्याच्या अंगात असल्यामुळे फिटोनं नकार दिला. मग निरुपाय झाल्यामुळे तो हळूहळू उठायचा. 'मी किती अशक्त आणि निरुपयोगी होत चाललोय ते बघा,' असं त्याला मुलांना दाखवायचं होतं.

रॅफेल इचॅव्हेरनची गोष्ट उलटी होती. त्याचं अवसान गळालं नव्हतं; पण शरीर कमजोर होत चाललं होतं. त्याचा जखमी पाय सुजल्यामुळे काळानिळा पडला होता आणि आता त्यात खूपच पूही झाला. विमानाबाहेर पडणं अगदीच अशक्य झाल्यामुळे आत कोंदट हवेमधे त्याला सारा दिवस काढावा लागे. त्याचा फुप्फुसांवर परिणाम होऊन श्वासोच्छ्वासात अडथळा येऊ लागला.

वर विछान्यावरच जास्त थंड वाटे म्हणून फर्नांडेझनं त्याला खाली आणला; पण त्या ठिकाणी वेदना अधिक होऊ लागल्यामुळे रॅफेलला पुन्हा वरच ठेवावं लागलं. एका रात्री त्याला वात झाला. 'माझ्याबरोबर दुकानात कोण येतंय् ?' तो बडबडू लागला. 'आपण ब्रेड आणि कोका–कोला आणू या.' नंतर तो ओरडला, 'पपा, पपा, आत या ! आम्ही इकडे आहोत.'

पेझ त्याच्याजवळ जाऊन म्हणाला, 'तुला काय सांगायचं असेल ते नंतर सांग. आधी माझ्याबरोबर प्रार्थना म्हण पाहू. 'हेल मेरी, फुल् ऑफ ग्रेस, द लॉर्ड इज विथ् दी......'

पेझकडे टक लावून रॅफेल प्रार्थनेचे शब्द पुटपुटू लागला. ती संपेपर्यंत त्याचे डोळे चकाकत राहिले. नंतर पेझ इन्झार्तेजवळ जाऊन पडला आणि रॅफेलनं प्रश्नांची अस्पष्ट पुनरावृत्ती सुरू केली.

'माझ्याबरोबर दुकानात कोण येईल ?'

'आत्ता नको,' मुलांनी त्याला समजावलं. 'उद्या मात्र नक्की जाऊ.' सर्वजण आतून पार हादरले होते. हळूहळू त्याचं बोलणं थांबलं; फक्त त्याच्या कष्टमय श्वासाचा धपापणारा आवाज तेवढा ऐकू येत होता. त्याची गती वाढली आणि एकदम थांबली. झेर्बिनो आणि पेझ उठले. अर्धा तास त्यांनी कृत्रिम श्वासोच्छ्वास देण्याचा प्रयत्न केला; पण बाकी मुलांच्या लक्षात आलं की रॅफेलचे प्राण त्याला केव्हाच सोडून गेले होते.

इचॅव्हेरनच्या मृत्यूचा सर्वांवर जबरदस्त परिणाम झाला. आपल्यालाही असंच मरण येऊ शकेल, हा विचार प्रत्येकाच्या मनात डोकावून गेला. फिटो रक्ताच्या विकारामुळे घाबरून गेला होता, एकाकी बनला होता. मृत्यूची चाहूल लागल्यामुळे त्याला देव जवळ असल्याचा भास होई. स्वतःला शांती मिळावी आणि बाकीच्या मित्रांनी नेहमी सुखात राहावं, याकरता तो सदैव प्रार्थना करा.

दुसऱ्या दिवशी त्याच्या मनाला पुन्हा उभारी वाटली. कारण त्या वेळेपर्यंत पहिली तुकडी चिलीत पोचली असणार आणि कुठल्याही क्षणी आपल्याला हेलिकॉप्टरची घरघर ऐकू येईल अशी त्याला खात्री वाटू लागली. सांगाड्यातल्या बाकी चौदा जिवंत असलेल्या मुलांचेही तसलेच विचार चालू होते. 'सुटकेला आता फार वेळ नाही.' तेवढ्यात संध्याकाळच्या बेताला त्यांच्यातल्या एकानं आरोळी ठोकली की तिघंही परतताना त्याला दिसले. फिटोनं स्वतः त्यांना धडपडत, कष्टानं चढत येताना पाहिलं आणि त्याच्या धार्मिक श्रद्धेचं संतापात रूपांतर झालं. ईश्वरानं केवळ चिरडण्यासाठी त्यांची आशा उंचावली होती. तिघांचं माघारी येणं हा त्याचा पुरावाच. बर्फावरून वेड्यासारखं सैरावैरा धावावं असा विचार त्याच्या मनात चमकूनही गेला; पण इतरांबरोबर दारात तो स्वस्थपणे बघत उभा राहिला. बाकीच्या मुलांचे चेहेरेही निराशेनं काळवंडले होते. ही दुःखाची परमावधीच होती.

कॅनेसा पुढे आला. मागून पेरॅडो आणि व्हिजिंटन. ऐकण्याच्या टप्प्यात तो आल्यावर त्याचा खणखणीत आवाज सर्वांच्या कानांवर पडला. 'हाय्, हाय्; मित्रहो, आम्हाला शेपूट सापडलं......सगळ्या बॅगाही......कपडे......सिगारेट्स.' तो विमानाजवळ पोचताक्षणीच सगळ्या मुलांनी त्याला गराडा घातला; उतावीळपणे काय घडलं ते मुलं ऐकू लागली. 'आपण ठरवलेला मार्ग योग्य नव्हता.' कॅनेसा म्हणाला, 'दरी पश्चिमेला जात नाही; सरळ पूर्वेकडेच जातीय्; पण आम्ही शेपूट सापडवलं आणि बॅटऱ्यासुद्धा. आता फक्त रेडिओ घेऊन खाली जायचं की बस्स् !'

काही काळ खचलेल्या मुलांचा उत्साह त्याच्या आत्मविश्वासपूर्ण उद्गारांमुळे पुन्हा उंचावला. काही मुलं रडू लागली. तिघांना मिठ्या मारू लागली. विजारी, स्वेटर आणि मोज्यांची नवी 'रसद' त्यांनी लुटली. तोपर्यंत पॅंकोनं सिगारेट्सचा ताबा घेतला.

[ क्रमशः ]

## बँक राष्ट्रीयीकरणाचे अर्धे तप : पृष्ठ १० वरून

संपल्याचे दुःख झाले ! त्यामुळे दुहेरी पतपुरवठा होत राहिला. कर्जे वुडत राहिली. जिथे बँका पोचल्या तिथलीही पतपुरवठ्याची तहान भागली नाही.

नव्या विभागीय ग्रामीण बँकांची कल्पना या पार्श्वभूमीवर तपासून पहायला हवी. पन्नास विभागीय बँकांच्या हजारो शाखा देशभर काढायच्या म्हणजे करोडो रुपये त्यात गुंतवावे लागतील. प्रत्येक विभागाचे प्रश्न भिन्न, त्यांचे स्वरूपही भिन्न. ग्रामीण बँका यशस्वी करायच्या तर ग्रामीण जनतेचे सहकार्य अत्यावश्यक. विभागाच्या ऊर्जितावस्थेची आच सर्वांना लागली पाहिजे. सत्तेचे विकेंद्रीकरण करावे लागेल पण ती ठराविक वर्गाच्या हाती जाणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. मिरासदाऱ्या मोडून काढून ग्रामीण जनतेला या कार्यात सामावून घ्यावे लागेल.

या बँकांची जडणघडण कशी असावी हे ठरविण्याकरता श्री. शिवरामन् यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीचा अहवाल सादर झाला आहे. समितीने ग्रामीण बँका स्पर्धक न होता पूरक ठराव्यात. शक्यतो त्या अदृष्ट बँकक्षेत्रात काढाव्यात. ग्रामीण बँकेचे अधिकृत भांडवल १ कोट रुपये असावे. त्यातील भरणा केलेले भांडवल २५ लक्ष रु. असावे. केंद्र, राज्यसरकारे आणि मातावँकेने या भागभांडवलात हिस्सा उचलावा. केंद्राचे भांडवल सर्वाधिक असावे. त्यामुळे ग्रामीण बँकांवर केंद्राचे वर्चस्व राहील. ग्रामीण बँकेचे एकूण ९ संचालक असावेत. चार केंद्र सरकारचे, एक राज्यसरकारचा प्रतिनिधी, दोन माता-बँकेचे (जी बँक ग्रामीण बँक स्थापन करील तिचे) आणि दोन व्यक्तिगत भागधारकांचे; पण तेही केंद्र सरकार नेमील. शिवरामन् समितीला संचालकमंडळाची निवडणूक मान्य नाही. नेमणूकच पसंत आहे. कारण निवडणूकपद्धतीतील गटबाजी, राजकारण, मिरासदारी या गोष्टी सहकारीक्षेत्रावरून आपल्याला ठाऊक आहेत. ग्रामीण बँकेत प्रारंभापासून हे गट-युद्ध नको असे समितीला वाटते. बँकेचा अध्यक्ष पूर्ण वेळ असेल व तो बँकेतला अनुभवी हवा. या पद्धतीमुळे ग्रामीण बँकेवर स्थानिक दडपणे कमी येतील. कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी अगर भागधारकांचा लाभांश याबाबतीत ग्रामीण बँकेने हात आखडता घेऊ नये; पण कारभाराविषयक खर्चात मात्र कपात करावी असे समिती म्हणते. प्रयोग म्हणून प्रथम फक्त ५ ग्रामीण बँका काढाव्यात व त्यांचा अनुभव घेऊन मग ५० बँका स्थापित करण्याचे उद्दिष्ट गाठावे असेही समितीने सुचविले आहे.

या बँकांनी दुर्लक्षित क्षेत्रांना पतपुरवठा करायचा आहे. त्यामुळे तारणविषयक कसोट्यांचा पुनर्विचार त्वरित व्हायला हवा. दुहेरी कर्जे टाळली पाहिजेत. कर्जदानाची नवी पद्धत शोधून काढली पाहिजे. जनतेला बँकेचा आधार वाटावा अशी परिस्थिती निर्माण झाली पाहिजे.

दि. १८ ऑगस्ट १९७५ रोजी या कल्पनेवर मुख्य मंत्री व अर्थमंत्री यांच्या परिषदेत शिक्कामोर्तबही झाले आहे. अशा वेळी पावले सावधपणे व डोळसपणे उचलायला हवीत एवढेच म्हणता येईल. या ग्रामीण बँकांच्या कर्मचाऱ्यांना बँककर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी लागू होणार नसून सरकारी कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी लागू होणार आहे असे ऐकतो. नवे आव्हान स्वीकारणारी ही मंडळी एकाच कामाकरता आपल्या इतर बंधूंपेक्षा कमी वेतन घ्यायला कितपत तयार होतील ते पाहायचे ! □




# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**६-९-७५ ते १२-९-७५**

### मध्यवर्ती मंत्रिमंडळात महत्त्वाचे बदल संभवतात.

भारताच्या अंतर्गत कारभारात आर्थिक स्वास्थ्याचा व सुधारणेचा प्रत्यय या वेळी विशेषत्वाने येणार आहे. सामान्य लोकांना एकदम समाधान वाटावे असे काही तरी घडण्याची शक्यता आहे. बाजारभाव, जीवनावश्यक वस्तूंचे भाव व त्यांची उपलब्धता सर्वसामान्य लोकांना समाधानकारक ठरावेत असे निर्णय तडकाफडकी घेतले जातील. आंतरराष्ट्रीय जगात भारताबद्दलचे कुतूहल व समज पुन्हा आश्चर्यकारक धक्के निर्माण करणार आहे. भारतातील जनता व राजकर्ते यांच्याबद्दल जगाचा पुन्हा भ्रमनिरास होणार आहे. या समाधानानुसार किंवा आश्चर्यकारक घटनेनंतर पंतप्रधान इंदिरा गांधींच्या मनात अनेक दिवस घोळत असलेली मंत्रिमंडळातील बदलाची योजना पुन्हा जोराने उसळी मारून येणार आहे. बदल होईल किंवा तशी योजना पक्की होईल. सिंहराशीच्या नेत्यांना धक्का जाणवेल. विरोधी पक्ष व सत्तारूढ पक्ष अधिक जवळ येण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र मंत्रिमंडळातदेखील काही बदलाची शक्यता निर्माण होईल.


बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना, ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठीं
खास नवीन प्रकार
स्वस्त दरात
बेल बॉटम पिसेस
कुडता पिसेस


### मेष : यशाची चढती कमान

सध्या ज्या राशीची माणसे आघाडीवर चमकत आहेत त्यांत तुमचाच अग्रक्रम आहे. आठवड्याची सुरुवात पाचव्या चंद्राने होत आहे. पाचवा रवी, दुसरा मंगळ, पहिला गुरु सारे ग्रह कसे तुमच्यासाठी—तुमच्या प्रगतीसाठी वचनबद्ध झाले आहेत. तुम्हाला राज-राजकारणात भाग घ्यायचा असेल तर हा आठवडा फार छान आहे. इंजिनियरिंग उद्योग, शेती, फळे, खते व औषधे यांपैकी एखादा धंदा सुरू करायला हा आठवडा प्रगतिकारक आहे. शनिवार, बुधवार व शुक्रवार नव्या कामाचा मुहूर्त करा. पत्रव्यवहारात यश येईल. नोकरीसाठी प्रयत्न करा. वरिष्ठ जागेसाठी मुलाखत आली तर यश हटकून पदरी पडेल. प्रमोशन व बढतीही मिळू शकेल. न्यायखात्यात वरची जागा मिळेल. महिलांना नोकरीत व कलाक्षेत्रात नेत्रदीपक यश मिळणार आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेत यश लाभेल.

### वृषभ : हेतू पूर्ण होतील

पहिला मंगळ, चौथा चंद्र व चौथा रवी असताना तुम्हाला खरे म्हणजे अस्वस्थ होण्याचे मुळीच कारण नाही. निष्ठेने एखादी गोष्ट तुम्ही जर केली तर त्यात तुमचे मनोरथ पूर्ण झाल्याखेरीज राहणार नाहीत. स्थावर व राहत्या घराचा प्रश्न या वेळी मार्गी लागणार आहे. खाजगी असो की सरकारी असो, एखादा वाद, तंटा असेल तर तो तुमच्याप्रमाणे होईल किंवा तसे वारे वाहू लागतील. सोमवार ते बुधवार विशेष महत्त्वाचे आहेत. गाठीभेटी, वाटाघाटी यासाठी अनुकूलता आहे. व्यवसायात एखादी नवी व धाडसी कल्पना प्रत्यक्षात आणावयाची असेल तर अवश्य विचार करा. नोकरीधंद्याची स्थिती एकंदरीत बरी राहील. काम फार पडेल. जबाबदारी वाढेल; पण मानही वाढेल. बेकारांना मार्ग दिसेल. विद्यार्थ्यांना अभिनयाची संधी मिळेल. महिलांना प्रवास व प्रतिष्ठा लाभेल. राहत्या जागेचा प्रश्न सुटेल.

### मिथुन : वादावादी नको

बौद्धिक क्षेत्रात तुम्हाला या वेळी काही तरी भरीव काम करता यावे असा ग्रहांचा आग्रह दिसतो. तुम्ही लेखक असाल तर तुम्हाला अफाट लोकप्रियता लाभणार आहे. तुमच्या ग्रंथाला बक्षीस, पुरस्कार असे काही तरी मिळेल. तुमच्या साहित्याला मागणी येईल. तुम्ही कवी असाल तर आकाशवाणीसारख्या माध्यमातून तुमचे नाव चमकेल. पत्रकारांना सरकारी कृपा लाभेल. नोकरीची परिस्थिती साधारणतः अनुकूल राहील. मनोरथ जरी पूर्ण झाले नाहीत, तरी कामाचा ताण कमी होऊन दर्जा वाढेल. मालक अगर वरिष्ठ यांची मर्जी व सहानुभूती राहील. तब्येतीला किरकोळ त्रास होईल; पण दिवस फुकट जाणार नाही. विद्यार्थीवर्गाने अभ्यासाकडे लक्ष द्यावे. त्यांना एखाद्या स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळेल. महिलांना स्वतः एखादी जबाबदारी घेऊन व्यवसायात अंगभूत गुण दाखवता येतील. स्त्रीलेखिकांना मोठी प्रसिद्धी व पैसा मिळेल.

### कर्क : नवी योजना आखा

दुसरा रवी-चंद्र तुम्हाला राजकारणाकडे खेचून नेणार आहे. या वेळी तुमची इच्छा असो वा नसो एखादी मोठी राजकारणी व्यक्ती तुमच्यावर प्रभाव टाकणार असून तुमचे स्थान उंचावणार आहे. सर्वसामान्य हा आठवडा प्रगतिकारक आहे. नोकरीच्या बाबतीत कोणतेही परिश्रम न घेता एखादा लाभ तुमच्या आपसूक पदरात पडणार आहे. परदेशभ्रमणाचा योगदेखील त्याचकारणाने आला तर आश्चर्य मानू नये. वाणिज्य, विज्ञान, तत्त्वज्ञान व पॉलिटिक्सचे विशेष अभ्यासक सरकारी नोकरीचे किंवा एखाद्या दर्जेदार कारखान्यांचे भागिदार ठरतील.

स्वतःचा उद्योग तूर्त फक्त विचाराधीन राहील. या वेळी आमदार, खासदार व असेच राजकारणी लोक जनतेत लोकप्रिय होतील. विद्यार्थी–विद्यार्थिनी अभ्यासात अगर खेळात चमकतील. महिलांची सार्वजनिक सेवा कौतुकाचा विषय ठरेल. एखादे मंडळ, कमिशन यांच्यावर पदवीधर महिलांना संधी मिळणार आहे.

### सिंह : सन्मानाचा योग

राशीतच चंद्र असताना व रवीदेखील राशीतच असताना आठवड्याची सुरुवात होत आहे ही एक महत्त्वाची घटनाच होय. तुम्ही राजकारणी असाल किंवा सार्वजनिक कार्यकर्ते असाल तर तुमचा जाहीर सत्कार अथवा सन्मान होईल. अनेक स्तुतिपर भाषणे वा लेखन याचा तुम्हाला लाभ होईल. तुम्ही नोकरीत असाल तर तुम्हाला महत्त्वपूर्ण अशी बढती वा प्रमोशन मिळणार आहे. तुम्ही शिक्षित असा की पदवीधर असा या आठवड्यात तुमच्या नोकरीचा प्रश्न सुटणार आहे. ही नोकरी कायम असेल. मात्र ती तुमच्या इच्छेप्रमाणेच असेल असे नाही. नोकरीत बदली करायला हरकत नाही. साडेसाती आहे त्यामुळे स्थानांतर घडेल. स्वतंत्र व्यवसाय सुरू करायचा असेल तर पैसा मिळू शकेल; पण फारच परिश्रम करावे लागतील. अपेक्षित व्यक्ती हेलपाटे घालूनदेखील सहज भेटू शकणार नाही. या वेळी सोमवार व बुधवार या दिवशी तुमच्या मनात निराशेचे व अनुत्साहाचे वातावरण राहील. विद्यार्थ्यांनी परीक्षेत भाग घेणे हिताचे ठरेल. त्यांना आर्थिक चणचण जाणवणार आहे. विवाहेच्छूंचे विवाह रेंगाळतील. महिलांना माहेरची स्थावर प्रॉपर्टी परिस्थितीनुरूप मिळेल. मुलांचे सुख मिळेल.

### कन्या : महत्त्वाच्या घटना

अकरावा शनि व भाग्यस्थानी मंगळ असल्यावर खरे तुम्ही काही कुरकूर करावी असे नाही; पण तुमचा स्वभावच तसा आहे त्याला दैव तरी काय करणार आहे? नाही म्हणायला रवि बारावा आहे. त्याची दखल तब्येतीसाठी व तुमच्या टीकाकारवृत्तिसाठी घेणे आवश्यक आहे. मध्येच निरुत्साह, अगतिकता याचा प्रादुर्भाव तुमच्या ठायी निर्माण होईल; पण अपवादात्मक असाच हा प्रकार असेल. टीकेच्या बाबतीत तुमची फाजील बुद्धिमत्ता तुमच्या हातून काहीही घडवील. पत्रकार असाल तर तुम्हाला महत्त्वाची संधी मिळेल. लेखणीला संधी मिळेल. नोकरीत बदल करण्याच्या दृष्टीने पावले टाकायला हरकत नाही. महत्त्वाच्या गाठीभेटी घ्यायला हरकत नाही. बेकारांना व्यवसाय मिळू शकेल. दुय्यम स्वरूपाचा एखादा उद्योग सुरू देखील होऊ शकेल; पण त्यात मन रमणे कठीणच आहे. पत्रव्यवहार होईल. अपेक्षित उत्तरे येतील. या वेळी धार्मिक कार्यात तुमचा पैसा खर्च होईल. काही येणे वसूल होईल. विद्यार्थ्यांना मात्र कलागुणांना संधी मिळेल. सिनेमा वा नाटकात संधी मिळेल. महिलांना मानसिक स्वास्थ्य मिळेल. पुत्रजन्माचा आनंद देखील मिळेल.

### तूळ : सारे काही ठीक

हर्शलचे अधिष्ठान अजून तुमच्या राशीवर आहे. त्यामुळे तुम्हाला अनेक क्षेत्रात प्रगती करण्याची संधी आपोआप चालून येत आहे. तुम्ही मुळातच कल्पक आहात. नव्या नव्या योजना आणि नव्या कल्पना सतत तुमच्या मनात शिजत असतात. या आठवड्यात अशीच एखादी योजना नोकरीच्या क्षेत्रात तुम्ही आखू शकाल की ज्यामुळे मालक अगर वरिष्ठअधिकारी तुमच्यावर बेहद्द खूष होतील. चालू नोकरीत महत्त्वपूर्ण घटना घडण्याची शक्यता आहे. तुम्ही विज्ञानाचे अभ्यासक असाल तर तुम्हाला सरकारी पुरस्कार मिळेल. संसारात या वेळी संगतीचा लाभ होईल. प्रामुख्याने पुत्रजन्माची इच्छा पुरी होईल. विद्यार्थ्यांना शिकता शिकता पैसे मिळवण्याची संधी मिळणार आहे. मानसिक स्थिती मात्र गोंधळाची राहील. संशयाने उगाच वागत राहाल. चालू व्यवसाय समस्येच्या बाहेर जाईल. महिलांना सार्वजनिक अगर मंगल कार्यात पुढाकार मिळेल. नोकरीत महत्त्वपूर्ण असे स्थान मिळेल.

### वृश्चिक : कौटुंबिक अडचणीवर मात

राशिस्वामी मंगळ 'संसारात' बसला आहे. तो तुमचा मालक असला तरी त्याची




दखल न घेऊन चालणार नाही. भाऊभाऊ; पतिपत्नी अगर इतर नातेवाईक यांच्यात संशयाने भांडण होईल; पण आनंदाची गोष्ट म्हणजे ते मिटेल देखील लगेच. फक्त त्रास होणारच. तुम्ही अधिकारी होऊ शकाल. आजवर तुम्हाला न मिळालेला चान्स या वेळी मिळून नोकरीत तुमचा अधिकार वाढेल. चार माणसे तुमच्या हाती अधिकार देतील. शेती-व्यवसायात व खताच्या व्यापारात नफा होईल. अगदी भरमसाट होईल; पण हर्बलच्या अस्तित्वाची दखल घ्या. बेकायदेशीर असे काही करू नका. यासाठी बदली तहकूब करून देण्याचे प्रयत्नात यश येईल. मंगळवार ते शुक्रवार देवतेची उपासना करा. आर्थिक बाजू कशी तरी सावरली जाईल. तोंड-मिळवणी होईल. विद्यार्थी-विद्यार्थिनी अभ्यासात मागे राहाण्याचा धोका आहे. महिलांनी हाती घेतलेल्या कामात निराळे लक्ष घालावे. नोकरीची इच्छा पुरी होईल.

## धनु : विरोधकांना यश कमी

वृषभराशीतील सहावा मंगळ हा एकटाच खरे म्हणजे तुमच्या बाजूने काही हालचाल करीत आहे. गेले काही दिवस गुरु-शुक्र तुमच्याविरुद्ध गुप्त कारवाया करीत आहेत. तुमच्याविरुद्ध एखादे कारस्थान रचीत आहेत; पण त्यांना अद्याप तरी यश आलेले नाही. येण्याची शक्यता नाही. मंगळ हे सारे उधळून टाकीत आहे. मात्र याचा अर्थ सारे काही ठाकठीक आहे असे समजू नका. आपल्या अवतीभवती काय चालू आहे, शत्रू कोण मित्र कोण याकडे डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवा. चालू व्यवसायात त्रास कमी होईल. अनेक समस्यांवर मात होईल. रविवारी एखाद्या सार्वजनिक कार्यात तुमचे नाव झळकेल. मंगळवारी व्यवसायात प्रगतिपर घटना घडतील. विद्यार्थी–विद्यार्थिनींना या आठवड्यात कलाक्षेत्रात गुण दाखवण्याची संधी मिळेल. शेतकरी व कारखानदार यांना सरकारी कृपा लाभेल. महिलांना उपासना करावी लागेल. एखाद्या उच्च गुरूचा आशीर्वाद मिळेल.

## मकर : दोलायमान मनःस्थिती

सध्या तरी शनी हाच एकमेव तुमचा आधार आहे. तो तुमच्या बाबतीत काही अघटित घडू देणार नाही. घडले तरी ते प्रत्यक्षात येणार नाही, मात्र तुम्हाला त्रास आहे. मन सतत उद्विग्न, शंकेने त्रस्त असे राहील. मनाला सतत काही तरी धाकधूक राहील. राजकारणात तुम्ही जर महत्त्वाची व्यक्ती असाल तर 'माझे स्थान जाणार का माझ्याविरुद्ध काही अकल्पित घडणार का' अशा शंकेने तुमचे मन अस्वस्थ राहील. मात्र प्रत्यक्षात तरी तुम्हाला काही होणार नाही. नोकरीच्या क्षेत्रात तुमच्या हातून जी माणसे दुखावली गेली आहेत, तुम्ही ज्यांच्यावर कडी केली आहे ती माणसे संधीची वाट पाहात आहेत हे दुर्लक्षू नका. बेकारांच्या बाबतीत एक अशी योजना सापडेल की आयुष्याची ददात मिटेल. गुणांना प्रोत्सोहन मिळेल. इंजिनियरिंग उद्योग व पोलादाचा उद्योग यात ज्यांचा संबंध आहे ते भरभराटीला जातील. शनिवारी उच्चपदस्थ अशा एखाद्या व्यक्तीची ओळख होईल. विद्यार्थी व विद्यार्थिनींना सहलीची संधी मिळेल. विवाहेच्छू लोकांना जरा थांबावे लागेल. महिलांना संसारात अडचणींना तोंड द्यावे लागेल; पण पैसा मात्र कमी पडणार नाही.




## कुंभ : महत्त्वाचे स्थान मिळेल

रवि या आठवड्यात तुमच्याबाबतीत काही घडवणार आहे की ज्यामुळे तुमची अतृप्त इच्छा पुरी होईल. कौटुंबिक जीवनात थोडा त्रास आहे. पति--पत्नीत मतभेद, मुलांबरोबर भांडणे, नातेवाइकांकडून त्रास असे काही तरी प्रकरण घडेल. पण ते पेल्यांतील वादळ ठरेल. कलागती लावणारेच नामोहरम होतील. इतर सर्व बाबतीत तुम्हाला हा आठवडा प्रगतिकारक आहे. रविवार, मंगळवार व बुधवार ह्या दिवसांची दखल घ्या. चालू नोकरीत तुम्हाला महत्त्वाचे स्थान मिळणार आहे. विशेषतः तुम्ही एखाद्या कारखान्यात वा संस्थेत महत्त्वाचे स्थान भूषवीत असाल तर तुमचे स्थान आहे त्यापेक्षा उंचावणार आहे. कदाचित तुम्ही त्या उद्योगात भागीदार देखील बनू शकाल. व्यापारात तुम्हाला लोकांकडून थोडाफार त्रास होण्याची शक्यता आहे. तुम्ही धान्यदुकानदार वा चहाचे दुकानदार असाल तर व त्रास होईल. राजकारणात तुम्हाला महत्त्वाचा सल्ला विचारला जाईल. देशाच्या उच्च स्थानात तुमची गणना होईल. विद्यार्थी व विद्यार्थिनी अभ्यासाकडे दुर्लक्ष करून 'प्रेमाचे चाळे' करणार आहेत. महिलाँना स्वतंत्ररीत्या एखादा उद्योग स्थापन करण्याची संधी मिळणार आहे. त्यांना नोकरीत प्रमोशन मिळणार आहे.

## मीन : वाङ्मयात प्रसिद्धीचा योग

मीनराशीची माणसे लेखनाशी संबंधित असतात तसेच त्यांना अध्यात्मिक वृत्ति असते. या आठवड्यांत या दोन्ही क्षेत्रांत तुम्ही भलचेच लोकप्रिय होणार आहांत. शंकराचार्य किंवा अशाच सर्वश्रेष्ठ व्यक्तीची तुम्हाला सावली मिळणार आहे. पत्रकारांना टीका करण्याची संधी मिळणार आहे. वाङ्मयीन कार्य देखील त्यांच्याकडून होणार आहे. ग्रंथप्रकाशन होईल. चालू नोकरीत वरिष्ठांची मर्जी बसेल. तुमची उपेक्षा संपून काही तरी नवे घडत असल्याचा तुम्हाला प्रत्यय येईल. शिक्षक, प्रोफेसर व वैज्ञानिक यांना नोकरीत महत्त्वाचे स्थान मिळणार आहे. बेकारांच्याबाबतीत सध्या तरी केवळ आश्वासनावर समाधान मानावे लागेल. विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिस्तीचा बडगा सहन करावा लागेल. विवाहेच्छूंना, संशोधनाला अनुकूल आहे; पण विवाह अजून एक आठवडा ठरवू नका. महिलांना उद्योगव्यवसायात प्रगतीची दिशा दिसेल. पैसा मिळेल. ☐ ☐

साहित्यसंघाचे

# स्तर–निविष्ट रंगमंचावर मृच्छकटिक

वि. भा. देशपांडे

मुंबई मराठी साहित्यसंघाने जुन्या संगीत नाटकांचे पुनरुज्जीवन प्रयोगरूपाने करण्याची योजना प्रत्यक्षात आणण्यास प्रारंभ केला आहे. नुकताच 'मृच्छकटिक' नाटकाचा प्रयोग पाहिला. प्रयोगाच्या वेळी एक छोटी पुस्तिका देण्यात आली होती. तीमध्ये श्रेय-नामावलीबरोबरच स्तर-निविष्ट रंगमंचा-संबंधीचे स्पष्टीकरणात्मक असे एक निवेदन आहे.

गाजलेल्या नाटकांतील नाटचाचे अभिजात स्वरूप अभ्यासून ते वेगळ्या स्वरूपात सादर करण्याचे प्रयत्न किती आवश्यक आहेत हे सांगत असतानाच निवेदनात म्हटले आहे– 'स्तर-निविष्ट रंगमंचाची योजना जुन्या पारंपरिक नाटकांच्या संदर्भात नवी असली तरी त्या नाटकांना न मानवणारी मात्र मुळीच नाही. उलट या रंगमंचावरून जुन्या नाटकांतील अभिजात नाट्य पुन्हा समर्थपणे सादर करता येईल याची खात्री वाटते. याकरिता वस्तुनिष्ठ तंत्राचे म्हणजेच पडद्या-फ्लॅटांचे, झालरींविगांचे, कप्पी-रश्शीचे अवडंबरी सामान बाजूला ठेवून, केवळ नाटचाविष्काराला साह्यभूत होणारा, सोयीचा, सुटसुटीत व सूचक रंगमंच उभारणे क्रमप्राप्त झाले...' हे सांगून झाल्यावर स्तर-निर्विष्ट रंगमंच म्हणजे काय? याचेही स्पष्टीकरण करण्यात आले. त्यामध्ये एक महत्त्वाचे विधान असे आहे की, '(या रंगमंचावर)... सारा व्यवहार वेगवेगळ्या स्तरांवरून घडत असल्यामुळे नटांची हालचाल व आंगिक अभिनय असणारे नाट्य गतिमान होऊ शकते. ही गतिमानता रंगमंचाच्या स्तरसिद्ध, स्तरनिविष्ट, स्तरजन्य प्रकृतीमुळेच शक्य होते...नट व प्रेक्षक यांच्या दृष्टीने या रंगमंचाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नट-प्रेक्षकांचा 'संवाद' साधण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य या रंगमंचावर अधिक सुकर होते.'

हे निवेदन वाचल्यावर प्रयोग-परिणामाच्या अपेक्षा साहजिकच उंचावल्या. त्यात सिद्धहस्त कलावंत चित्रकार गोडसे यांनी हा रंगमंच सिद्ध केलेला होता. या स्तरनिविष्ट रंगमंचाचे निर्मिती-संकल्पन करताना श्री. गोडसे यांच्या डोळ्यांसमोर नेमकी कोणती कल्पना होती हे निवेदनात पुरेसे स्पष्ट झाले आहे; परंतु त्या निर्मिती-संकल्पनेमागचा विचार प्रत्यक्ष प्रयोगात तितक्या प्रकर्षाने आला नाही. रंगमंचावरील वेगवेगळ्या स्तरांना विशिष्ट स्थलाचा निर्देश देण्याचा प्रयत्न प्रस्थापित होऊ शकला नाही. जाणवले ते असे की, सर्व स्तरांवर सर्व पात्रे मुक्तपणे वावरत होती. त्यांच्या येण्या-जाण्यामध्ये रुळाच्या पडद्याचा (कप्पीच्या आवाजाचा) व्यत्यय नव्हता एवढेच!

पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे जाणवले ते असे की, जर स्तरनिविष्ट रंगमंचाची निर्मिती इतक्या जाणीवपूर्वक विचारांनी करण्याचे योजले होते, तर त्याला सुसंवादी ठरणारी अभिनयरीती का स्वीकारण्यात आली नाही? स्तर-निविष्ट रंगमंचामुळे येणारी सूचकता–, प्रतीकात्मकता जर अभिप्रेत असेल तर ती अभिनयरीतीतही मान्य व्हावयास पाहिजे. या प्रयोगात सरधोपट ढोबळ अभिनयरीतीचा सर्रास वापर होता. रंगमंचपद्धती बदलूनही अभिनयपद्धतीत बदल का नाही, हे मात्र कळू शकले नाही.

तसेच स्तरनिविष्ट रंगमंच स्वीकारल्यानंतर नाटकातील पद-गायनाची पद्धतीही बदलणे अगत्याचे होते. नाटकातील नायक-नायिका जुन्याच पद्धतीने रंगमंचाच्या मध्यावर ध्वनिक्षेपकासमोर येऊन (समोरच्या वादकांवर नजर ठेवून) पदे म्हणत होती त्याच वेळी रंगमंचातील सूचकता आणि रंगमंचावर पदगायनाची पद्धती यात अंतर पडले. (स्तर निर्माण झाले.)

गोविंद बल्लाळ देवल यांच्या 'मृच्छकटिक' नाटकाची रंगावृत्ती तयार करणे हे काम दाजी भाटवडेकर यांनी केले होते. त्यामध्ये एक गोष्ट प्रामुख्याने खटकली ती म्हणजे विद्याधर गोखले यांच्या काही पदांचा अंतर्भाव केला होता; तो कशासाठी? देवलांनी केलेली पदे रसनिर्मितीच्या, प्रयोगपरिणामाच्या दृष्टीने उणी आहेत का? एखाद्या नाटकाची रंगावृत्ती तयार करताना मूळ संहितेत जर काही भाग अनावश्यक वाटला तर तो कमी करणे एक वेळ मान्य होऊ शकते; पण त्यामध्ये अधिक काही भर घालणे हे केव्हाही अनिष्टच आहे. मागे एकदा संघानेच केलेल्या 'अम्मलदार' नाटकात एक पात्र आणि काही संवाद नव्याने घातल्याचे ऐकिवात होते. हे स्पृहणीय नाही. रंगभूमीच्या संदर्भात या प्रथा वाईट वळण पाडीत आहेत.

इतके विस्ताराने लिहिण्याचे कारण म्हणजे संघ आता काही जुन्या संगीत नाटकांना नवे रूप देत आहे. जुनी संगीत नाटके जरूर चांगल्या रूपात रंगभूमीवर यावीत. त्यांचे स्वागत आहे; पण ती प्रयोगरूपाने आणताना जर स्तर–निविष्ट रंगमंचाचा वापर होणार असेल तर अभिनयरीतीचा, पदगायनपद्धतीचा आणि रंगावृत्तीचा विचार एकत्रित व्हायला पाहिजे. अन्यथा नेहमीप्रमाणेच प्रयोग होतील आणि विस्मृतीत जमा केले जातील. पुन्हा ती नाटके काही पदांच्यासाठी पाहिली-ऐकली जातील, नट–प्रेक्षक यांच्यातील अपेक्षित 'संवाद' साधला जाणे ही गोष्ट अवघड होऊन बसेल. ◻

## नवा 'लाल्या'–रमेश भाटकर

'अश्रूंची झाली फुले' हे अनेक शतक–महोत्सवी नाटक काही नव्या कलाकारांच्या साह्याने पुन्हा रंगमंचावर आले आहे. त्या नाटकाच्या संहितेबद्दल आणि प्रयोगपरिणामाबद्दल नव्याने लिहिण्याचे कारण नाही. त्या नाटकात 'लाल्या'च्या भूमिकेत रमेश भाटकर आता काम करू लागला आहे. पहिले काही प्रयोग तो प्रेक्षकांच्या दडपणात आणि पूर्वसूरींच्या अनुकरणात अडकलेला राहणार, हे उघड आहे. कारण डॉ. काशिनाथ घाणेकरांनी आपल्या अभिनयपद्धतीनुसार ती भूमिका रसिकप्रिय केली होती. प्रेक्षकांवर त्या अभिनयाची मुद्रा स्थापिली जाणे हे स्वाभाविक होते; परंतु अगदी नव्याने 'अश्रू' पाहणाऱ्या प्रेक्षकालाही या नाटकाला दाद

द्यावीशी वाटत असेल तर त्या अनेक कारणांमध्ये रसेश भाटकर याचे काम ही एक लक्षणीय गोष्ट आहे. आज तरी अभिनय संयत स्वरूपात व्यक्त होतो आहे. काही प्रयोगांनंतर जेव्हा तो अनुकरणातून मुक्त होऊन स्वतःच्या काही कल्पना वापरून ही भूमिका साकार करू लागेल तेव्हा वेगळे मूल्यांकन करता येईल. तसा काही वेगळा विचार त्याने करावा अशी इच्छा आहे. कारण तसे काही घडले तरच नव्या नाटकात एखादी महत्त्वपूर्ण भूमिका मिळणे त्याला सुकर जाईल. पुण्याच्या हौशी रंगमंचावर त्याला प्रेक्षकांनी पाहिलेला आहे. नाटकाला आवश्यक असणारी देहयष्टी आणि चेहरा त्याच्याजवळ आहे. आवाज आणि शब्दही बरा आहे. परंपरेने आलेले घरातील गाणेही काही प्रमाणात आहे. या सर्व गोष्टींमुळे त्याच्याकडून काही चांगल्या भूमिका साकार होतील अशी अपेक्षा. □

# 'आर. डीं'चा कसोटीकाळ – एक प्रतिक्रिया

सुमारे दोन महिन्यांपूर्वी आपल्याकडे प्रसिद्ध झालेला अरुणा अंतरकर यांचा 'आर. डी. चा कसोटीकाळ' हा लेख परवा वाचनात आला. त्या लेखावरची ही प्रतिक्रिया बराच उशीर झाला असला तरी प्रसिद्ध करावी.

खरं तर ह्या लेखाचा रोख फक्त आर. डी. कडेच नको होता. कारण हे अपयश फक्त आर. डी. चंच नव्हे! तर आज लक्ष्मी-प्यारे, कल्याणजी आनंदजीसारखे बुजुर्ग संगीतकारही फारसं चांगलं संगीत देत नाहीत. कल्याणजी आनंदजीने तर जंजीर, कोरा कागज, कहानी किस्मत की, हाथकी सफाई इ. चार-पाच चित्रपट सोडले तर इतर चित्रपटांत विशेष काय दिले? तेच एल. पी. चे! आपल्या म्हणण्याप्रमाणे बॉबीसह सर्व हिट चित्रपट खिशात घालणाऱ्या (?) एल. पी. नेही प्रेमकहानी, आक्रमण, गीता मेरा नाम, लोफर, दुल्हन, पैसे की गुडीयाँ, ज्वार भाटा, पॉकेटमार, लफंगे इ. चित्रपटांत काय दिले? त्यांतील पहिले ३।४ चित्रपट व लफंगे हे तर बड्या निर्मात्यांचेच आहेत ना? मग तो त्यांच्या 'अपयशाचा आलेख' होऊ शकत नाही का? मग हा कसोटीकाळ आर. डी. चाच आहे की आजच्या संगीतकारांचा?

आर. डी. तसं पाहिलं तर 'वेस्टर्न म्युझिक'चा पुरस्कर्ता. अर्थातच सुरुवाती-सुरुवातीच्या 'तिसरी मंझिल'पासूनच त्यानं उसळतं संगीत देण्यास सुरुवात केली.अर्थातच जेव्हा 'हरे राम हरे कृष्ण' सारखा 'नशिला' चित्रपट आर. डी. ला मिळतो तेव्हा तो त्यात 'वेस्टर्न म्युझिक'चा पुरेपूर उपयोग करणारच! परंतु ह्याचा अर्थ त्याने प्रत्येक चित्रपटात असे संगीत द्यावे का? चित्रपट जर तसाच 'डॅशिंग' व मनोरंजनावर भर देणारा असेल तरच असे संगीत देणे उचित ठरेल. उदा. कारवाँ, यादोंकी बारात जवानी दिवानी, मेरे जीवनसाथी इ.

अरुणाबाईंच्या म्हणण्याप्रमाणे आर. डी. च्या सिनेसंगीतक्षेत्रातल्या अनन्यसाधारण महत्त्वाला ग्रहण लागणारसं दिसतं! कारण म्हणे देव आनंद, राजेश खन्ना, शक्ति सामंत ही एके काळी आर. डी. ची समजली जाणारी माणसं आज त्याची राहिली नाहीत. शक्ति सामंत व राजेश खन्नाच्या बहुतेक चित्रपटांना आर. डी. चंच संगीत असणार असा म्हणे अलिखित नियम होता! पण तसं पाहिलं तर आजही राजेश खन्नाच्या बहुतेक चित्रपटांना आर. डी. चंच संगीत आहे. उदा. शंकर बी. सी. चा नरेंद्र बेदी दिग्दर्शित 'राजेश खन्ना अँज ००७', मुशिर-रियाजचा 'महबुबा', नडियादवालांचा शम्मी दिग्दर्शित करत असलेला 'बंडलबाज;' आर. एस. जे. प्रॉडक्शनचा (नमकहराम) 'नौकरी' (दिग्दर्शित–हृषिकेष मुखर्जी); व्ही. गोपीकृष्णचा 'भोलाभाला' इतकेच नव्हे तर बी. आर. चोप्रांचा 'कर्म' इ. राजेशकडे असलेल्या चित्रपटांना आर. डी. चंच संगीत आहे आणि विशेष म्हणजे हे सर्व चित्रपट 'बड्या निर्मात्यांचे' आहेत! तीच गोष्ट शक्ति सामंतांची! 'आराधना'च्या यशानंतर फक्त 'अनुराग' व 'अमानुष' सोडल्यास त्यांचे सर्व चित्रपट आर. डी.कडेच होते! एवढेच नव्हे तर स्वतः दिग्दर्शित करीत असलेला परंतु दुसऱ्या निर्मात्याचा 'चरित्रहिन'ही शक्ति सामंतांनी आर. डी. कडेच दिला होता. तसेच येणाऱ्या चित्रपटांपैकी सी. व्ही. के. शास्त्रींचा 'दि ग्रेट गँबलर' हा शक्ति सामंत स्वतः दिग्दर्शित करीत असलेला चित्रपटही आर. डी. कडेच आहे! देव आनंदच्या 'नवकेतन'च्या 'इश्क, इश्क, इश्क'पर्यंतच्या सर्व चित्रपटांचे संगीत 'बर्मन-कॅम्प'चेच होतं (एस. डी., आर. डी. व जयदेव) परंतु 'हिरा-पन्ना' व 'इश्क'च्या आर्थिक अपयशानंतर देव आनंदची भूमिका असलेला फक्त 'अमीर-गरीब' चालला. अर्थात देवजी स्वतःच्या पुढील चित्रपटासाठी (जान-ए-मन) अमीर-गरीबचे युनिटच पसंत केले–प्रेमनाथ, देव आनंद, हेमामालिनी व संगीत लक्ष्मी-प्यारे. परंतु ह्याचा अर्थ आर. डी. आनंदपरिवाराच्या बाहेर गेला नाही. कारण 'नवकेतन'चा पुढील चित्रपट 'बुलेट' नुकताच विजय आनंदनी घोषित केला आहे व त्याच्या संगीताची जबाबदारी राहूल देवकडेच सोपविली आहे.

हे झाले देव, राजेश व शक्ति सामंतच्या बाबतीत; पण इतरही बहुतेक बड्या निर्मात्यांचे व बड्या कलाकारांचे चित्रपटही 'पंचम' (आर्. डी.) कडेच आहेत. उदा. नासीर हुसेनचा 'आग का दर्या', सिप्पींचा 'शोले', हृषीकेश मुखर्जींचा 'डॉक्टर बाबू'. सुनिल दत्तचा 'नेहले पेहला', संजयचा 'चांदी सोना', शिल्पकारचा 'काला सोना', अशोक रॉयचा (चोर मचाए शोरचे दिग्दर्शक) 'हिरालाल पन्नालाल', राजेंद्रनाथचा 'दि गेट क्रॅशर', विश्वजीतचा 'कहते हैं मुझको राजा' व प्रॉडक्शन नं. २, एन्. पी. इंटरनॅशनलचे 'वॉरंट', व 'राजा और राणा', नरीमन इराणींचा 'डॉन' व इतर अनेक. मात्र 'बॉबी' मधील सर्व गाणी हिट करूनही एल्. पी. कडे 'जिंदा दिल' सोडला तर ऋषी कपूर भुमिका करत असलेला दुसरा चित्रपट असल्याचे ऐकिवात नाही. तेच 'जहरीला इन्सान' व 'खेल खेल में' नंतरही आर्. डी. कडे ऋषीची भुमिका असलेले बरेच चित्रपट आहेत. उदा. राजा (निर्माता चिन्नप्पा देवर); नया दौर; शहरी बाबू; गुनेहगार वगैरे वगैरे. खरं म्हणजे 'बॉबी'च्या यशानंतर ऋषी कपूरच्या बहुतेक चित्रपटांना 'एल्. पी' चंच संगीत असणार अशी सर्वांची कल्पना झाली होती; परंतु प्रत्यक्षात मात्र बऱ्याचशा निर्मात्यांनी ऋषीची भूमिका असलेल्या चित्रपटांच्या संगीतनियोजनाची जबाबदारी 'राहूल देव' कडेच सोपविलेली दिसते. तेव्हा ह्या सर्व परिस्थितीत 'आर्. डी.'च्या अनन्यसाधारण महत्त्वाला ग्रहण लागल्याचा" आरडाओरडा फोल ठरतो. तेव्हा हे सर्व केल्यावर 'आर्. डी.'च्या भवितव्याबद्दल प्रश्नचिन्ह वगैरे दाखवून 'सोवळेपणा' कशाला?

आपला

**–शरद कामत,** कुलाबा

# मराठी सिनेमा तेजाळला आहे!

शरद गोखले

वर्षाभरापूर्वीचीच गोष्ट आहे. महाराष्ट्र शासन प्रतिवर्षी मराठी चित्रपटांना जी पारितोषिके देते त्या पारितोषिकांच्या संदर्भामध्ये मोठा तिढा पेच पडला होता. प्रतिवर्षी आटत चाललेल्या मराठी सिनेमाने गेल्या साली पुच्छ गतीची कमालच केली. पारितोषिकासाठी केवळ पाच चित्रपट डेरेदाखल झालेले. निवड समितीचे काम एकदम सोपे. उडदामाजी काळे–गोरे करून त्यांनी ' सुगंधी कट्टा ' हे राम कदम व यासीन या जोडीचे चित्र सन्मानित केले. याच सुमारास मराठी चित्रपटांपासून गोळा झालेला कर मोठ्या प्रमाणावर परत करण्याची योजना घोषित झाली आणि मरगळलेला मराठी सिनेमा बघता बघता तेजाळला.

कलेच्या दुनियेमध्ये वावरूनही–रुपये आणि पैचा हिशेब ज्यांनी कधी उभ्या जन्मात सोडला नाही ते शान्तारामबापू अशा उत्साहाने मराठी चित्रसृष्टीमध्ये रमले आहेत की हिन्दी फ़िल्मी दुनियेशी यांचा काही संबंध असावा याचाच मंडळींना विसर पडला आहे. बापूंच्या पायाशी बसून ज्यांनी सिनेमाचे धडे गिरवले त्या पुण्यावर पंधरा वर्षांच्या खडतर तपश्चर्येनंतर बापू प्रसन्न झाले आणि ' चंदनाची चोळी ' रवीन्द्रच्या नावाचे कुंकू लावून पडद्यावर चढली. गल्ल्यावर जमा झालेली थप्पी आणि कर परत योजनेखाली परत येणारा पैसा याचा हिशेब बांधला तर राजकमलच्या जमेच्या बाजूला पाच–सात लाखांचे धन सहजी जमा व्हावे. चंदनाची चोळी टेकिंगच्या बाबतीत ' पिंजरा ' प्रभावित होती. तरी रवीजवळ चमक असल्याची पोच चित्राने दिली. मनुष्य प्रज्ञावंत झाला, स्वतःचा स्वतः विचार करू लागला की राजकमलमधून अलगद बाहेर पडतो किंवा फेकला जातो. रवीबाबूही आता स्वतंत्रपणे उभे राहत आहेत. त्यांच्या पहिल्या चित्रामध्ये जयश्री टी आणि अरुण सरनाईक ही जोडी चमकणार आहे.

असं म्हणतात की या दृश्याची जाहिरात झळकू लागल्यावर ( डॉ. लागू आणि भावना ) मावळतीकडे झुकलेले काचेचा चंद्र हे नाटक शतकमहोत्सवाकडे घोडदौड करू लागले; पण हे दृश्य ज्योतिबाच्या नवसाला काही पावले नाही. ( राजशेखर, आशा काळे )




राजकमलमध्येही निर्मितीची धावपळ चालू आहेच. अण्णांचा मुलगा किरण पिताजींच्या खास मार्गदर्शनाखाली ‘ झुंज ’ लढवत आहे.

दरम्यान गेल्या चार–सहा महिन्यांमध्ये जी चित्रे आली त्यापैकी ‘ ओवाळिते भाऊराया ’ आणि ‘ भक्त पुंडलिक ’ या दोन चित्रांचा अपवाद वगळता बाकीच्या तमाम चित्रांनी चांगला धंदा केला आहे. भक्त पुंडलिक पौराणिक चित्राला सामाजिक आशय देण्याच्या प्रयत्नात फसले. यशवन्त दत्त, सरला येवलेकर, राजशेखर आपआपल्या जागी मजबूत असूनही चित्र कोलमडले. ओवाळिते भाऊराया सेन्सॉरच्या तडाख्यात सापडले. चित्राचा विषय कौटुंबिक जिव्हाळ्याचा पण सेन्सॉरने तो हाताळला ‘प्रभात’ नावाचे जे हिन्दी चित्र होते त्याच्या पातळीवर. निर्माता जाम वैतागला. ‘ ए ’ सर्टिफिकीट घेऊन–ओवाळिते भाऊराया चालणार कसे ? परिणामी सेन्सॉरने सांगितली तशी कात्री चित्रावर चालली आणि तरीही जे सुटले ते काही अगदीच टाकाऊ नव्हते. मुहूर्त वयून पुण्यात चित्र आणले पण तरीही व्हायचा तो बोऱ्या झालाच.



पाच रंगांची
पाच पाखरंमधील
एक पाखरू. उषा नाईक.

चालू गेलेल्या चित्रात दादाचा ‘ पांडू हवालदार ’ नेहमीप्रमाणे अचाट यश मिळवत आहे. कोल्हापूर बन्द असूनही पांडू जिथे उतारी करतो आहे तिथून उदंड चांदी गोळा करून दादांची धन करतो आहे. ‘ ज्योतिबाचा नवस ’ पुण्यात चार आठवडे चांगले खेळवले गेले. कोल्हापूर, सांगली येथे ज्योतिबा खरंच पावला; पण चित्र पुण्यात चाललेच पाहिजे अशा अट्टाहासाने कमलाकर तोरणे यांनी चित्र चालवले. नऊशे खुर्च्यांच्या चित्रगृहाने–पन्नास माणसांना ज्योतिबा दाखवला. हा हट्ट चालवताना परत येणाऱ्या कराची नोंद डोक्यात असते; पण हा असला आतबट्ट्याचा धंदा मराठी सिनेमाने करू नये. कर–परत योजनेच्या उद्दिष्टाला ते बाधक आहे आणि येणाऱ्या नवीन चित्रपटांनाही त्रासदायक आहे. ज्योतिबाचो री ‘ करावं तसं भरावं ’ वाल्यांनी ओढली. आठ–नऊ आठवडे चित्र चांगले गेले. पुढे डेफिसिटमध्ये चालवले. हे तकलादू समाधान घेण्याचा मोह सोडणे अत्यंत आवश्यक आहे.



उषा चव्हाण, दादा कोंडके पांडू हवालदारमध्ये.

पांडू हवालदार

तरी अजून कोल्हापूरची उतारी बाकीच आहे.



बापू संबंधी विचार करण्यात रंगून गेलेली गणा मोहित्यांची रंगू.
अशी हा साताऱ्याची तऱ्हामध्ये पारितोषिक घेऊन गेली.





करावं तसं भरावं मधे निळू फुले.
सध्या मराठी चित्रात या नावाला पर्याय नाही.

शानो मुव्हिजची 'वरात' निर्मिती–अवस्थेमध्ये जास्त गाजली. चोऱ्यामाऱ्यांची प्रकरणे तशी नेहमीच चालू असतात–हे शेवटपर्यंत चालवले गेले. जयंत वालावलकर लेखक म्हणून आपला रास्त हक्क शाबीत करून गेले. छायालेखक सूर्यकान्त लवंदे यांची कामगिरी सुरेख. 'उमा' हे तसे मागे पडलेले नाव. जयश्री गडकर हे नाव जसे एकदम अदृश्य झाले तसेच उमाचे झाले. जाताना अशी ही साताऱ्याची तऱ्हा या चित्रासाठी ती उत्कृष्ट पारितोषिक घेऊन गेली.

अनंत माने यांची पाच रंगाची पाच पाखरं हा चित्रपट आहे का पडद्यावर पेश केलेली सगितीका आहे. असा संभ्रम पडला...आणि तरीही या उडत्या गिर्रेबाज पाखरांनी अनंत माने यांची यशस्वी परंपरा नेटाने चालवली.
'सामना' हा एक वेगळा चित्रपट खरा. दोन पुरुष कलाकारांवर चित्रित केलेली प्रदीर्घ लांबीची दृश्ये हे या 'विलक्षण बडबड्या' चित्राचे वैशिष्ठ्य ठरले. उस चरख्यामध्ये पिळून काढावा तसे हे चित्र पुण्यात पिळले गेले. मिळेल त्या प्रत्येक चित्रगृहामध्ये हजेरी लावून व अखेरीस आयंन 'मॅटिनी' साजरी करून चित्राने पुणेकरांचा निरोप घेतला. त्या नंतर बर्लिन पब्लिसिटीची लाट आली. चित्र बर्लिनला गेले ही कौतुकाची बाब, त्याला चांगला प्रतिसाद मिळाला ही आणखी आनंदाची बाब. पण या बर्लिनच्या टाळ्यांचे किती कौतुक करायचे याचे काही ताळतंत्र. नुसत्या टाळ्यांना ही दाद तर चित्र पारितोषिक घेऊन येते–तर त्याची पडघम वर्षभर ऐकावी लागली असती.
कलाकारांपैकी निळू फुले ( सामना, करावं तसं भरावं, वरात ), उषा चव्हाण ( पांडू हवालदार वरात ) ही तशी सेट झालेली मंडळी

डॉ. श्रीराम लागूंचा हा गांधीवादी मास्तर
–सामना.





हिन्दीच्या वाटा बंद झाल्या. मग चला कोल्हापूरला.
नंदा आणि तिचा भाऊ जयप्रकाश
लावणी झाली ग रागिणीच्या सेटवर.

अलिकडल्या काळामधील सगळ्यात चांगली आवक म्हणजे यशवंत दत्त–सुगंधी कट्टा, तेवढं सोडून बोला, भक्त पुंडलिक, करावं तसं भरावं, प्रत्येक चित्राबरोबर पट्टा पुढे सरकत राहिला.

मराठी सिनेमाची दिशा आणि गती लक्षात आल्यावर अनेक मंडळी मराठी सिनेमाच्या प्रेमाने भारावून गेली. अनेक वर्षे थंड असलेले विश्वास सरपोतदार, अनंत माने, राम कदम आणि शंकर पाटील यांना साथीला घेऊन अरे संसार संसार चित्र सुरू करत आहेत. हिन्दीच्या वाटा बन्द झाल्यावर विनायकाच्या कन्येला आपल्या मराठीपणाची याद आली आहे. आपल्या भावाला दिग्दर्शक म्हणून उभे करण्याचा तिचा प्रयत्न आहे. चित्राचे नाव आहे–लावणी झाली ग रागिणी मुक्काम मुंबईमध्ये असला तरी मराठी चित्राची याद येताच आठवण नेमकी कशी लावणीची येते नाही ? हिन्दी मराठीच्या सिमारेषेवर वावरणारे वसन्त जोगळेकर आपल्या पत्नीसाठी ' हा खेळ सावल्यांचा ' हे चित्र हातावेगळे करत आहेत. अलिकडेच पुण्यामधील एका बंगल्यामध्ये या चित्रपटाचे पंधरा दिवसाचे चित्रीकरण उरकण्यात आले ' वऱ्हाडी वाजंत्री ' फसल्यावर राजदत्त थंडावले होते. आता त्यांची मेव्हणी सीमा आणि साडू रमेश देव त्यांच्या मदतीला धावले आहेत. ' या सुखांनो या ' हे नवीन चित्र जवळ जवळ पूर्ण होत आले आहे. गेल्याच आठवड्यामध्ये ' पदराखालची माया ' हे प्रभाकर नायक यांच्या दिग्दर्शनाखालील चित्र सेटवर गेले आहेत. अनंत माने एका तरुणीच्या उध्वस्थ जीवनावरील सत्यकथा पडद्यावर आणण्याच्या प्रयत्नामध्ये आहेत. रसीक चित्रचे दत्ताराम गायकवाड यांनी ' पांडोबा पोरगी फसली ' हे चित्र पूर्ण करत आणले आहे. दादा पांडूचा गठ्ठा मोजून झाल्यावर नवे चित्र हाती घेत आहेत.

निर्माते दत्ताराम गायकवाड आणि यशवंत दत्त.
पांडोबा पोरगी फसलीच्या सेटवर.



तात्पर्य काय–तर तेजाळलेला मराठी सिनेमा उत्साहाचे एक नवीन पर्व घेऊन आला आहे. मराठी चित्राला आश्रयही वाढता आहे. जमाखर्चाची गोळा बेरीज सध्या तरी जमेच्या बाजूने कलती आहे. अर्थात वर्षाअखेरीस पुन्हा एकदा रोजमेळ मांडणे आवश्यक आहेत.

■ ■